
# परिसर परिचय

ऑगस्ट २०२३ | अंक ९०वा | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण









## म्हाडाचा सर्वसामान्यांना गृहस्वप्नांचा आधार;
## गिरणी कामगारांसाठी हक्काच्या निवाऱ्याचा निर्धार!


महाराष्ट्र
दिन
म्हाडा
MHADA
परिसर परिचय ऑगस्ट 2023


















म्हाडा MHADA

# परिसर परिचय

ऑगस्ट २०२३
अंक ९० वा




मुखपृष्ठ संकल्पना
वैशाली गडपाले
हेमंत पाटील

संपादक
वैशाली गडपाले
मुख्य जनसंपर्क अधिकारी

संपादन सहाय्य
हेमंत पाटील
जनसंपर्क अधिकारी



या अंकात प्रकाशित झालेल्या लेखकांचे विचार हे त्या त्या व्यक्तीचे असून, प्राधिकरण त्या विचारांशी सहमत असेलच असे नाही.


## अनुक्रमणिका


६ | अभिनंदन
श्री. अतुल सावे यांनी गृहनिर्माण मंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारला



७ | अभिनंदन
गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिवपदी श्रीमती वल्सा नायर-सिंह



८ | अभिनंदन
म्हाडा उपाध्यक्षपदाचा कार्यभार श्री. संजीव जयस्वाल यांनी स्वीकारला



४ | संपादकीय
पुनश्च हरिओम

५ | दोन शब्द



३६ | प्रतिभा आणि प्रतिमा
इच्छा तेथे मार्ग



२६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे वाचावे?

ठळक बातम्या २८ ते ३५

- माहीमच्या जसोदा इमारतींचा रखडलेला पुनर्विकास विकासकाने तात्काळ सुरू करावा
- उपकरप्राप्त इमारतींचे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प लवकरच मार्गी लागणार
- टाटा मेमोरियल रुग्णालयाला म्हाडाने दिल्या १०० सदनिका
- म्हाडा मुख्यालय : महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण
- सोलापूरमधील रे नगर गृहनिर्माण प्रकल्प
- श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे मंडळाची सोडत
- औरंगाबाद मंडळाची ८४९ सदनिकांची ऑनलाईन सोडत
- मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कोंकण मंडळाची सोडत
- कविता : गुंफण



९ | प्रधानमंत्री आवास
आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची उत्पन्नमर्यादा आता सहा लाखांवर



१० | IHLMS 2.0
म्हाडाची संगणकीय सोडत प्रक्रिया अत्याधुनिक



१२ | म्हाडा अर्थसंकल्प
महाराष्ट्रात येत्या आर्थिक वर्षात १२,७२४ सदनिका बांधण्याचे प्रस्तावित



१४ | 'गृहरत्नभूषण'
म्हाडाचा चित्ररथ



१६ | 'अर्बन व्हिलेज'
कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्प



१९ | मंडळाचे आवाहन
१५ अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारती



२०-२१ | महिला दिन



२२ | चाव्यांचे वाटप
४१८ गिरणी कामगारांना सदनिकांच्या चाव्यांचे वाटप



२४ | सामाजिक बांधिलकी
दोनशे ग्रामस्थांचे करणार पुनर्वसन

## संपादकीय

# पुनश्च हरिओम

आयुष्याच्या धबडग्यात अनेक गोष्टी मागे पडत असतात. काही मागे सुटतात, काही कायमच्या नाहीशा होतात तर काही सरकार दफ्तरी दिसेनाशा होतात. कोरोनाच्या महामारीत अशा अनेक गोष्टी आपण हरवल्यात. काही नव्याने तयार झाल्या. काहींचा मुळीच थांगपत्ता लागला नाही. तर काही पुन्हा पुन्हा डोके वर काढत आहेत. काही पुन्हा जिवंत होत आहेत. नव्याने स्वत:चे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हाडा, सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नांची पूर्तता करणाऱ्या या संस्थेचे स्वत:चे असे मुखपत्र आहे. तुम्ही त्याला संस्थातर्गत स्वगत म्हणा हवे तर, पण गेल्या अनेक वर्षांमध्ये म्हाडातील सर्व कर्मचाऱ्यांचे हे हक्काचे व्यासपीठ होते. 'परिसर परिचय' या नावाने गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही म्हाडाची परंपरा कोरोनाच्या काळात अचानक खंडित झाली. पण झाले गेले गंगेला मिळाले म्हणतात ना...ते जाऊ द्या... आता आपले हे हक्काचे व्यासपीठ पुन्हा एका नव्या रूपात आपल्या भेटीला येणार आहे. ते पुन्हा एकदा तुमच्या-आमच्या आयुष्याचा भाग होणार आहे. 'परिसर परिचय'चे पुनरागमन ही आनंदवार्ता आहे आणि त्यासाठीच हा लेखनप्रपंच...

एरवी चांगल्या कामाची सुरुवात चांगले मुहूर्त काढून, सणवारांना करण्याची पद्धत आहे आपल्याकडे; पण भारतासाठीचा सर्वांत मोठा सण कुठला असेल तर तो आपला स्वातंत्र्यदिन होय. यानिमित्ताने यंदा १५ ऑगस्ट २०२३ रोजी 'परिसर परिचय' नव्या रूपात आपल्यासमोर घेऊन येताना मला अतीव आनंद होतोय... तब्बल तीन वर्षांच्या अवकाशानंतर 'परिसर परिचय'चा नव्वदावा अंक प्रकाशित होतो आहे. मुंबई शहराच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक जडणघडणीत गिरणी कामगारांचा मोलाचा वाटा आहे. गिरणी कामगारांना हक्काचा निवारा मिळवून देण्याची जबाबदारी शासनाने म्हाडाकडे सोपविली आहे. शासनाच्या संकल्पपूर्तीचे काही विशेष क्षण मुखपृष्ठावर टिपण्यात आले आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला हक्काचा निवारा उपलब्ध करुन द्यावा या उद्दिष्टाशी कटिबद्ध असलेल्या म्हाडाच्या सामाजिक बांधिलकीचा जणू पुनश्च प्रारंभ मुखपृष्ठावर साकारलेल्या छायाचित्राद्वारे दर्शविण्याचा प्रयत्न संपादकीय चमूने केला आहे.

या वर्षीपासून आपल्या लाडक्या त्रैमासिकाचा अंक आम्ही आपल्याला डीजिटल रूपातदेखील उपलब्ध करून देत आहोत. 'परिसर परिचय'ला म्हाडाची बखर म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. गृहनिर्मितीच्या क्षेत्रातील म्हाडाची ऐतिहासिक वाटचाल, म्हाडाने वेळोवेळी राबविलेल्या लोकाभिमुख गृहयोजना, गृहनिर्मितीच्या विकासकामांचा आढावा घेणारे लेख, म्हाडा परिवारातील सदस्यांचे ललित लेखन, प्रवासवर्णन, कविता अशा विविध साहित्यरचनांनी बहरलेला 'परिसर परिचय'चा अंक आता शतकपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. सर्वसामान्यांसाठी गृहनिर्मिती करणाऱ्या म्हाडाने कोरोना काळात तात्पुरत्या रुग्णालयांची निर्मिती करून सामाजिक बांधीलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. म्हाडाच्या घरांच्या विक्रीकरिता पारदर्शक संगणकीय सोडत प्रणालीच्या माध्यमातून म्हाडाने सर्वसामान्यांच्या मनात जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. सदनिका विक्रीच्या संगणकीय सोडत प्रणालीवर नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी म्हाडाच्या संगणक कक्षाने मानवीय हस्तक्षेपविरहित नूतन संगणकीय प्रणाली IHLMS २.० कार्यान्वित केली आहे. या वर्षाची सुरुवात पुणे मंडळाच्या सदनिका विक्री सोडतीने झाली. त्यापाठोपाठ औरंगाबाद मंडळ, कोंकण मंडळाने देखील यशस्वीरीत्या सदनिका विक्रीच्या सोडती काढल्या आहेत. तसेच मुंबई मंडळाच्या ४,०८२ सदनिका विक्रीच्या सोडतीलादेखील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या सक्षम नेतृत्वाखाली म्हाडाच्या आगामी प्रकल्पांना वेग प्राप्त झाला आहे. म्हाडाच्या या विकासवेलीवरील प्रत्येक घडामोड आता 'परिसर परिचय'च्या माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. तेव्हा तुम्ही या आपल्या लाडक्या मुखपत्राचे मनापासून स्वागत कराल या अपेक्षेसह...

**पुनश्च हरिओम!**

**- वैशाली गडपाले**

**मुख्य जनसंपर्क अधिकारी, म्हाडा, मुंबई.**



श्री. संजीव जयस्वाल
उपाध्यक्ष तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण

# दोन शब्द

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे मुखपत्र असलेल्या 'परिसर परिचय'च्या ९०व्या अंकाच्या निमित्ताने आपणाशी हितगूज करण्याची मी प्रथमच संधी घेत आहे. कोरोना महामारी आणि लॉकडाऊनच्या अनुभवांनी आपल्याला खूप काही शिकविले आहे. या महामारीदरम्यान संपूर्ण मानवी समाजाला एका विचित्र परिस्थितीला तोंड द्यावे लागले. त्यातही विशेषत: मुंबईसारख्या महानगरांमध्ये कामाच्या शोधात येणाऱ्या सर्वसामान्य माणसाकरिता त्याचा हक्काचा निवारा असणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीवदेखील अधिक तीव्र झाली. मुंबईसारख्या महानगरात आज जागांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. परिणामी घरांच्या किमतीदेखील सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. अशा परिस्थितीत घरांची मागणी आणि पुरवठा यातील दरी दिवसेंदिवस वाढतानाच दिसते आहे. ही तफावत कमी करण्यासाठी म्हाडा आता पुन्हा एकदा कंबर कसून कामाला लागणार आहे. सर्वसामान्य माणसाला परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देणे हाच या संस्थेचा उद्देश असून त्याकरिता यापुढील काळात यथाशक्ती प्रयत्न करण्यात येतील, यात कुठलीही शंका बाळगण्याचे कारण नाही.


आजघडीला देशातील सर्वांत मोठी गृहनिर्मिती करणारी संस्था म्हणून नावलौकिक असलेली ही संस्था शतकपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. म्हाडाचा प्रमुख या नात्याने मला या गोष्टीचा अतीव आनंद आहे. म्हाडाने राज्यातील सात लाख कुटुंबीयांना हक्काचा निवारा मिळवून देण्याचा विक्रम केला आहे. सात दशकांच्या या यशस्वी प्रवासामध्ये राज्यातील नागरिकांची विश्वासार्हतादेखील म्हाडाने प्रामुख्याने कमावली आहे. लॉकडाऊनच्या कालखंडात गृहनिर्मिती क्षेत्रात जी स्थित्यंतरे घडली, त्यामुळे गृहनिर्मिती हे एक आव्हान ठरले आहे. आजचा काळ हा कठीण स्पर्धेचा असल्याने आपल्या कार्यपद्धतीमध्ये बदल घडवून कामाचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्याकरिता आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत. व्यवसायिक स्पर्धेचे भान ठेवून म्हाडाला आपली पुढील वाटचाल ठरवावी लागणार आहे. गृहनिर्मितीला वेग देणारे शासन निर्णय आपले हात बळकट करत आहे. म्हाडा ही एक अभियांत्रिकी संस्था असल्याने प्रशिक्षित मनुष्यबळ आपल्याकडे आहेच. शिवाय आर्थिक पाठबळ, अद्ययावत तंत्रज्ञान आणि गृहनिर्मितीचा पूर्वानुभवदेखील म्हाडाकडे आहे. मुंबई महानगराच्या सर्वांगीण विकासाकरिता केंद्र शासन व राज्य शासन सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. बीडीडी पुनर्वसन प्रकल्प, पोलीस वसाहत आणि कामाठीपुरा पुनर्वसन प्रकल्पांच्या कार्यान्वयात आपली भूमिका मोलाची ठरणार आहे. तसेच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या यशस्वी अंमलबाजवणीची जबाबदारीदेखील तितक्याच सक्षमतेने आपल्याला पेलायची आहे. राज्य शासनाच्या सकारात्मक धोरणामुळे म्हाडाच्या धोकादायक ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. गृहबांधणी क्षेत्रात म्हाडाचा नावलौकिक आहे; परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील म्हाडाला आदर्श गृहनिर्माण संस्थेचा दर्जा मिळवून देण्याचे आव्हान समर्थपणे पेलण्यास आपण सर्व एकजुटीने प्रयत्नरत राहण्याची अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो आणि 'परिसर परिचय'च्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

संवाद आहेच... तो अधिक वृद्धिंगत व्हावा, या अपेक्षेसह...

**- संजीव जयस्वाल,**

**उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण**

# अभिनंदन!



## श्री. अतुल सावे

**मा. मंत्री, गृहनिर्माण,**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

श्री अतुल मोरेश्वर सावे यांनी नुकताच गृहनिर्माण मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला आहे. श्री. सावे यांच्याकडे गृहनिर्माण विभागासह इतर मागास बहुजन कल्याण मंत्रिपदाचीही जबाबदारी आहे. श्री. सावे औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत असून ते पदवीधर आहेत. सन २०१४, सन २०१९ मध्ये श्री. सावे या मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. माजी खासदार श्री. मोरेश्वर सावे यांचे ते सुपुत्र असून तीर्थरूपांचा समाजकारण आणि विकासाचा लाभलेला वारसा ते अत्यंत सक्षमपणे सांभाळत आहेत. सन २०१८ मध्ये सर्वोत्तम कार्यामुळे श्री. सावे यांना राज्यमंत्रिपद (उद्योग आणि खनिकर्म अल्पसंख्यांक विकास व वक्फ, महाराष्ट्र राज्य) तसेच हिंगोली जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी काम करण्याची संधी मिळाली.

### राजकीय कारकीर्द

**सन २०१४ – २०१९**
आमदार, औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघ

**सन २०१८ – २०१९**
राज्यमंत्री, उद्योग आणि खनिकर्म, अल्पसंख्याक विकास वक्फ, महाराष्ट्र राज्य

**सन २०१९ –**
वर्तमान: आमदार, औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघ

# अभिनंदन!



## श्रीमती वत्सा नायर-सिंह

**अपर मुख्य सचिव,**
**गृहनिर्माण विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव म्हणुन श्रीमती वत्सा नायर-सिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीमती नायर-सिंह १९९१च्या बॅचच्या भारतीय प्रशासन सेवेतील (भा.प्र.से.) अधिकारी आहेत. गृहनिर्माण विभागाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी श्रीमती नायर-सिंह पर्यटन विभागाच्या प्रधान सचिवपदी कार्यरत होत्या. गृहनिर्माण विभागातील पहिल्या महिला अपर मुख्य सचिव म्हणून त्यांना बहुमान मिळाला आहे.

श्रीमती नायर-सिंह यांचा जन्म केरळमधील कोची येथे झाला असून भारतीय प्रशासन सेवेतील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात सन १९९३ मध्ये उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे उप-प्रभागीय न्यायाधीश पदाने झाली. त्यानंतर सन १९९८ मध्ये महाराष्ट्र राज्यात त्यांची बदली झाली. चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारीपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच विदर्भातील गडचिरोली जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारीपदी त्या कार्यरत होत्या. सन २००६-०७ मध्ये त्या मुंबई शहराच्या अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत होत्या.

सन २००७-०८ मध्ये विभागीय आयुक्त कोंकण विभाग म्हणून त्यांनी काम केले आहे. सन २००८ साली त्यांनी न्यूयॉर्कमधील सिरोकूस महाविद्यालयातून 'पब्लिक पॉलिसी' या विषयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले. न्यूयॉर्कमधून परत आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागात प्रधान सचिवपदाचा पदभार स्वीकारला. त्यांनी सन २०१४ मध्ये नागरी उड्डाण, उत्पादन व अबकारी विभागाच्या प्रधान सचिव म्हणूनही काम केले आहे. त्यांनी विविध ठिकाणी केलेल्या विशेष कार्यांबद्दल त्यांचा अनेक सन्मान आणि पारितोषिकांनी सन्मान करण्यात आला आहे.



# अभिनंदन!

## श्री. संजीव जयस्वाल,

**उपाध्यक्ष तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. संजीव जयस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री. जयस्वाल १९९६च्या बॅचचे भारतीय प्रशासन सेवेतील (आय.ए. एस.) अधिकारी आहेत. म्हाडा उपाध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी श्री. जयस्वाल महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवपदी कार्यरत होते.

श्री. जयस्वाल यांनी आतापर्यंत महत्त्वपूर्ण अशा विविध पदांवर काम केले आहे. यामध्ये प्रामुख्याने सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून नाशिक आणि तळोजा (जि.नंदुरबार) येथे काम केले आहे. त्यानंतर नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयात उपसचिव, चंद्रपूर आणि औरंगाबादचे जिल्हाधिकारी, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त, औरंगाबादचे विभागीय आयुक्त, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणूनही त्यांनी काम केले आहे. विविध ठिकाणी केलेल्या विशेष कार्याबद्दल त्यांना विविध सन्मान आणि पारितोषिके देवून गौरविण्यात आले आहे.



# म्हाडा - प्रधानमंत्री आवास योजना

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची उत्पन्नमर्यादा आता सहा लाखांवर

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
Pradhan Mantri Awas Yojana-Urban

प्रधानमंत्री आवास योजना - शहरी विभागांतर्गत मुंबई महानगर क्षेत्रातील भागीदारी माध्यमातून परवडणारी गृहनिर्मिती (AHP) योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची उत्पन्नमर्यादा रुपये तीन लाखांवरून रुपये सहा लाखांपर्यंत वाढवण्याचा निर्णय केंद्र शासनाने नुकताच घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर क्षेत्रातील भागीदारी माध्यमातून परवडणारी गृहनिर्मिती (AHP) घटकांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची उत्पन्नमर्यादा वाढविण्याबाबत केंद्र शासनाला विनंती केली होती. त्यानुषंगाने केंद्र शासनातर्फे आदेश काढण्यात आला आहे. केंद्र शासनाचे उपसचिव श्री. एस. के. बब्बर यांनी या निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे राज्य शासनाला कळविले आहे. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील नागरिकांना शहरी भागात परवडणाऱ्या दरात हक्काची घरे उपलब्ध होणार आहेत. तसेच म्हाडाच्या सोडतीत विक्रीकरिता असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांचा लाभदेखील जास्तीत जास्त नागरिकांना घेता येणार आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे औचित्य साधून केंद्र शासनाने प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील प्रत्येक बेघर नागरिकास हक्काचा निवारा मिळवा, असा संकल्प केला. याच संकल्पनेतून प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) हा कार्यक्रम केंद्राच्या गृहनिर्माण आणि नागरी दारिद्र्य निर्मुलन मंत्रालयाद्वारे सुरू करण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी म्हाडाला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

भागीदारी माध्यमातून परवडणारी घरे (AHP ) या घटकांतर्गत उभारण्यात येत असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक घरास केंद्र शासनातर्फे रु. १.५ लाख रुपये आर्थिक मदत केली जाते. या योजनेंतर्गत उभारण्यात येणारा गृहनिर्माण प्रकल्प हा किमान २५० घरांचा असावा आणि त्यापैकी ३५ टक्के घरे ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखीव असावीत, असा नियम आहे.




# IHLMS 2.0
# म्हाडाची संगणकीय सोडत प्रक्रिया अत्याधुनिक



**वैशाली गडपाले**
मुख्य जनसंपर्क अधिकारी, म्हाडा

*आपलं घर ते आपलंच असतं*
*मग ते लहान असो की मोठं*
*श्वास सुखाचा इथेच मिळतो,*
*मायेची ऊबही इथेच मिळते*
*क्षण समाधानाचे इथेच मिळतात*
*आपलं घर ते आपलंच असतं*
*म्हणून एक तरी घरं आपलं असावं!*

अशा काहीशा भावना जोपासत मुंबईत येणारा प्रत्येक माणूस आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पाहत असतो. ते पूर्ण होण्याची आतुरतेने वाट पाहत असतो. त्याच्या या स्वप्नांना आस असते ती म्हाडाच्या घरांच्या सोडतीची. जनसामान्यांचा म्हाडावरील विश्वास आणि त्या विश्वासाची जोपासना करण्याचे म्हाडाचे उत्तरदायित्व हे समीकरण अत्यंत अतूट आहे. म्हाडा ही गृहबांधणी क्षेत्रातील शिखर संस्था आहे. स्वातंत्र्योत्तर काळात म्हाडाने निर्वासितांच्या संक्रमण शिबिराच्या निर्मिती केली. तेव्हापासूनच समाजातील दुर्बल घटकांच्या निवाऱ्याच्या प्रश्नाशी म्हाडाची बांधिलकी निर्माण झाली ती आजही कायम आहे. गेली सात दशके म्हाडा अव्याहतपणे या क्षेत्रात कार्यरत आहे. या कालावधीत म्हाडाने राज्यात सात लाख कुटुंबीयांना हक्काचा निवारा मिळवून दिला आहे. यामध्ये म्हाडाच्या सदनिका विक्रीकरिता आवश्यक असलेल्या सोडत प्रक्रियेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मानवीय सोडत, संगणकीय सोडत आणि आजची मानवीय हस्तक्षेपविरहीत आयएचएलएमएस २.० प्रणालीद्वारे काढण्यात येणारी ऑनलाईन सोडत अशा विविध प्रक्रियांच्या माध्यमातून नागरिकांना पारदर्शक पद्धतीने घरे मिळावी याकरिता म्हाडा कायम प्रयत्नशील राहिली आहे. म्हाडातर्फे उभारण्यात आलेल्या सदनिकांची विक्री पारदर्शक संगणकीय सोडतीच्या माध्यमातून करत, देशातील गृहनिर्मितीतील अग्रगण्य संस्थेने राज्यातील नागरिकांचा आजवर विश्वास संपादन केला आहे. म्हाडाच्या विभागीय मंडळांतर्फे दरवर्षी सदनिका विक्रीच्या सोडती जाहीर केल्या जातात. नागरिकांकडूनही त्याला मोठा प्रतिसाद मिळत असतो. म्हणूनच सदनिका विक्रीची जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर सोडतीपर्यंतचा प्रवास म्हणजे म्हाडासमोर एक मोठे आव्हान असते. लाखो अर्जदार सोडतीत सहभाग घेत असले तरी यशस्वी अर्जदारांची संख्या ही जाहीर सदनिकांइतकीच असते. या परिस्थितीत सोडतीतील पारदर्शीपणा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांचा विश्वास संपादन करणे हेच म्हाडासमोरचे मोठे आव्हान असते. हे आव्हान पेलण्यासाठी म्हाडाने ही अद्ययावत संगणकीय प्रणाली तयार केली आहे.

IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System) एकात्मिक गृहनिर्माण सोडत व्यवस्थापन प्रणाली ही म्हाडाच्या संगणकीय सोडत प्रणालीचे २.० व्हर्जन आहे. संगणक कक्षाच्या प्रमुख श्रीमती सविता बोडके यांच्या सक्षम नेतृत्वाखाली सदनिका विक्रीच्या संगणकीय सोडत प्रणालीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महत्त्वपूर्ण बदल करून २.० व्हर्जनची निर्मिती केली. यानिमित्ताने सोडत संगणकीय आज्ञावली अधिकाधिक पारदर्शक, सोपी, सुलभ आणि सुरक्षित करण्याचा प्रयत्न म्हाडाने केला आहे. सोडत प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता नोंदणी, अर्ज भरणा प्रक्रिया, कागदपत्रांचे सादरीकरण, पात्रता निश्चिती, ऑनलाईन सोडत, सदनिका वितरण, सदनिकेच्या रकमेचा भरणा अशा सर्व प्रक्रिया मानवी हस्तक्षेपविरहित पद्धतीने होत आहेत.

## नोंदणी प्रक्रिया

म्हाडाचे घर घेण्यास इच्छुक असलेले नागरिक बसल्या जागी या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून आपल्या अर्जाची नोंदणी करू शकतात. https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेत स्थळावर अर्ज नोंदणी प्रक्रिया उपलब्ध आहे. त्याचबरोबर तुमच्या मोबाईलमध्येदेखील या नूतन संगणकीय प्रणालीचे सॉफ्टवेअर उपलब्ध आहे. अण्ड्रोईड व्हर्जनच्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअर आणि आयओएस व्हर्जनवर ॲपस्टोरमध्ये संगणकीय सोडतीचे अप्लिकेशन MHADA HOUSING LOTTERY SYSTEM या नावाने उपलब्ध करून देण्यात आले आहे. हे ॲप अर्जदार आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करून केव्हाही आणि कुठेही म्हाडाच्या सोडतीत सहभागी होऊ शकतात. विशेष म्हणजे सोडत जाहीर झालेली असो अथवा नसो नोंदणी प्रक्रिया कायम खुली राहणार आहे. अर्जदार केव्हाही या प्रणालीत आपली नोंदणी करून ठेवू शकतात.

## तांत्रिक नावीन्य

नवीन संगणकीय सोडत आज्ञावलीमध्ये पारदर्शकता, सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांतर्फे डीजिटल स्वरूपात सादर करण्यात आलेली माहिती जतन करून ठेवली जाते. या जतन केलेल्या माहितीमध्ये कोणीही बदल करण्याचा प्रयत्न केल्यास सहज लक्षात येऊ शकते. ही प्रणाली वेळोवेळी स्वयंचलित पद्धतीने अद्ययावत होणार आहे. त्यामुळे यातील माहिती मानवी हस्तक्षेपविरहित आणि अत्यंत सुरक्षित राहते.

## नव्या प्रणालीचे फायदे

- नवीन संगणकीय सोडत प्रणाली म्हाडासाठीच नव्हे तर नागरिकांसाठी देखील अत्यंत सोयीची आहे. सोडतीत सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेल्या नोंदणी प्रक्रियेदरम्यान नागरिकांकडून त्या-त्या आरक्षित प्रवर्गानुसार कागदपत्रांची मागणी केली जाते. अर्जदारांची पात्रता सोडतीच्या आधीच निश्चित होते. त्यामुळे या प्रणालीने पात्र ठरविलेले अर्जदारच सोडतीत सहभागी होत आहेत.
- नोंदणी प्रक्रियेदरम्यान अर्जदारास एक युनिक क्रमांक दिला जातो आणि त्याआधारे अर्जदाराचे प्रोफाईल प्रणालीमध्ये कायमस्वरूपी तयार होते. म्हाडाने मागणी केलेली सर्व कागदपत्रे अपलोड करणारे व अनामत रकमेचा विहित वेळेत भरणा करणारे अर्जदारच सोडतीसाठी पात्र ठरतात. अशा प्रकारे संगणकीय प्रणालीमध्ये पात्र अर्जदारांना म्हाडाच्या कोणत्याही मंडळाच्या पुढील प्रत्येक सोडतीवेळी नव्याने अर्ज भरण्याची आवश्यकता लागत नाही. जोपर्यंत अर्जदार म्हाडाच्या सोडतीत यशस्वी होत नाहीत तोपर्यंत अर्जदार हे म्हाडाचे पात्र अर्जदार असतील आणि केवळ इच्छित सदनिकेसाठी अनामत रकमेचा भरणा करून ते म्हाडाच्या सदनिका विक्रीच्या सोडतीत सहभागी होऊ शकतील.
- प्रचलित पद्धतीनुसार पात्रता निश्चितीकरिता विजेत्या अर्जदारांकडून २१ कागदपत्रे मागविण्यात येत होती; मात्र नवीन प्रणालीअंतर्गत केवळ सात प्रकारची कागदपत्रे सोडतीपूर्वीच अर्जदारांकडून स्वीकारण्यात येत




आहेत. यामधील शपथपत्र, स्वयंघोषणापत्र तसेच स्वीकृतीपत्र संगणकीय प्रणालीद्वारेच निर्मित केले जात असून अर्जदाराच्या आधार ई-स्वाक्षरीने त्यावर स्वाक्षरी करून घेण्यात येत आहे.
- अर्जदारांच्या अर्जाची अचूक पडताळणी IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System द्वारे केली जात आहे. ही प्रणाली शासनाच्या विविध डेटाबेससोबत जोडली जाणार आहे. ज्यामध्ये डिजीलॉकर, महा-ऑनलाईन, इन्कम टॅक्स, आधार, जात प्रमाणपत्र, राज्यातील वास्तव्याचे प्रमाणपत्र तसेच पीएमएवायच्या एपीआयचा वापर करून अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी ऑनलाईन पद्धतीने त्वरित केली जात आहे. अशा प्रकारे संगणकीय प्रणालीने पात्र ठरवलेले अर्जदारच सोडतीत सहभाग घेत आहेत.
- प्रचलित पद्धतीनुसार सोडतीच्या पात्रतानिश्चितीपासून ते प्रत्यक्ष ताबा देण्याच्या प्रक्रियेमध्ये मनुष्यबळसह अंदाजे एक वर्षाचा कालावधी लागतो. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये ८ ते १० वर्षे अथवा त्याहीपेक्षा अधिक कालावधी लागतो. नव्या संगणकीय प्रणालीच्या वापरामुळे पात्रता निश्चिती मानवी हस्तक्षेपाशिवाय विनाविलंब होत आहे. शिवाय त्यामुळे कामकाजामध्ये अधिक पारदर्शकता आली आहे. अशा प्रकारे सोडतीकरिता लागणारे मनुष्यबळ आणि वेळ कमी होऊन म्हाडाचा आर्थिक फायदा होण्यासही मदत होत आहे. याद्वारे कामकाजामध्ये पादरर्शकता, गतिमानता आणि किमान न्यायालयीन दाव्यांचे म्हाडाचे उद्दिष्ट साध्य होत आहे.
- विशेष म्हणजे नागरिकांना सोडतीत सहभागी होण्याकरिता नोंदणी प्रक्रिया अमर्याद खुली ठेवण्यात आली आहे.
- अर्जदारास नोंदणी करतेवेळी प्राप्त झालेल्या युनिक क्रमांकाच्या आधारे अर्जदार आपल्या वैयक्तीक आयुष्यात झालेल्या बदलांची केव्हाही आपल्या अर्जात नोंद करू शकतात. वैवाहिक स्टेटस, उत्पन्न मर्यादेतील बदल इत्यादी बदल करण्याची त्यात मुभा आहे.
- सोडतीत सदनिका प्राप्त झालेल्या अर्जदाराची माहितीदेखील या प्रणालीत जतन केली जाते. अशा अर्जदारांनी पुन्हा अर्ज केल्यास त्यांचा अर्ज प्रणालीतून रद्द होऊन त्यांना तत्काळ याबाबतची माहिती भ्रमणध्वनीवर दिली जाते.
- बदलत्या काळाची आव्हाने लक्षात घेता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत तयार करण्यात आलेली नवी संगणकीय सोडत प्रक्रिया खऱ्या अर्थाने म्हाडास आणि राज्यातील नागरिकांसाठी एक पर्वणी ठरली आहे.






## अर्थसंकल्प म्हाडाच्या गृहनिर्मितीचा : २०२२ - २०२३

# महाराष्ट्रात येत्या आर्थिक वर्षात १२,७२४ सदनिका बांधण्याचे प्रस्तावित

**हेमंत पाटील**
**जनसंपर्क अधिकारी, म्हाडा**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) सन २०२२-२३ चा सुधारित व सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प प्राधिकरणास नुकताच सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात येत्या आर्थिक वर्षात राज्यात म्हाडा १२,७२४ सदनिका बांधणार असल्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सन २०२३-२०२४ च्या १०१८६.७३ कोटी रुपयांच्या व सन २०२२-२०२३ च्या सुधारित ६९३३.८२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला प्राधिकरणाची मान्यता मिळाली आहे. सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पात शून्य तूट तर सन २०२२-२०२३ च्या सुधारित अर्थसंकल्पात १,१३६.४७ कोटी रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात प्राधिकरणाच्या मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती या प्रादेशिक मंडळांतर्फे एकूण १२, ७२४ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात ५,८००.१५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मुंबई मंडळांतर्गत येत्या आर्थिक वर्षात २,१५२ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात ३,६६४.१८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मंडळातर्फे बीडीडी चाळींचा पुनर्विकास योजनेसाठी २,२८५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अँटॉप हिल वडाळा येथील गृहनिर्माण योजनेसाठी २४ कोटी रुपये, बॉम्बे डाईंग मिल, वडाळा योजनेसाठी ३० कोटी रुपये, कोपरी पवई येथील गृहनिर्माण योजनेसाठी १०० कोटी रुपये, कन्नमवारनगर विक्रोळी येथील योजनेसाठी २१३.२३ कोटी रुपये, मागाठाणे बोरिवली येथील योजनेसाठी ५० कोटी रुपये, खडकपाडा दिंडोशी येथील योजनेसाठी १८ कोटी रुपये तर पहाडी गोरेगाव येथील योजनेसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरीक्त गोरेगाव सिद्धार्थनगर (पत्राचाळ) प्रकल्पासाठी ३०० कोटी रुपये, धारावी पुनर्विकास प्रकल्प टप्पा १ ब साठी ५९ कोटी रुपये, गोरेगाव मोतीलालनगर पुनर्विकास प्रकल्पासाठी १० कोटी रुपये, पोलिस गृहनिर्माण प्रकल्प वसाहतीच्या पुनर्विकासासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

कोंकण मंडळांतर्गत ५,६१४ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित असून सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात त्यासाठी ७४१.३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई मंडळाच्या विरार बोळींज गृहनिर्माण प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात १० कोटी रुपये, बाळकुम ठाणे गृहनिर्माण प्रकल्पासाठी ३३ कोटी रुपये, माजिवडा ठाणे संयुक्त भागीदारी प्रकल्पासाठी ३५ कोटी रुपये, मिरा रोड टर्न की प्रकल्पासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

## दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

| अ. क्र. | लेखाशीर्ष | मंजूर अर्थसंकल्प सन २०२२-२३ | सुधारित अर्थसंकल्प सन २०२२-२३ | अर्थसंकल्प सन २०२२-२३ |
|---|---|---|---|---|
| | **जमा** | | | |
| १ | महसुली | १,२४९.३६ | १,१६९.९६ | ९७९.८५ |
| २ | भांडवली | ३,३९२.५० | १,५७३.२४ | ४,८४८.७० |
| ३ | कर्ज व अग्रीम | ५,२५.९२ | ३८०.२५ | १,०१५.२१ |
| ४ | अनामत | १,८४९.७४ | १,८४०.०० | २,३४०.३६ |
| | **एकूण** | **७,०१७.५२** | **४,९६३.४५** | **९,१८४.११** |
| ५ | शासकीय अनुदान | ८६१.५५ | ८३३.९० | १,००२.६२ |
| | **एकूण** | **७८७९.०७** | **५७९७.३५** | **१०१८६.७३** |
| | **खर्च** | | | |
| १ | महसुली | १,२३२.६६ | १,१११.७२ | १,१३०.६६ |
| २ | भांडवली | ७,४७७.७८ | ३,५४८.२० | ६,३६३.०६ |
| ३ | कर्ज व अग्रीम | ११.१३ | १२८.०८ | ५३.९३ |
| ४ | अनामत | १,८१०.७२ | १,८३५.६१ | २,३२२.२४ |
| | **एकूण** | **१०,५३२.२९** | **६,७४१.४०** | **९,८६९.८८** |
| ५ | शासकीय अनुदान | २३२.७० | १९२.२२ | ३१६.८५ |
| | **एकूण** | **१०७६४.९९** | **६९३३.८२** | **१०१८६.७३** |
| | **शिल्लक (+)/ तूट (-)** | **- २,८८५.९२** | **- १,१३६.४७** | **०.००** |

### पुणे मंडळांतर्गत

८६२ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ५४०.७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### नागपूर मंडळांतर्गत

१,४१७ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ४१७.५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### औरंगाबाद मंडळांतर्गत

१,४९७ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात २१२.०८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### नाशिक मंडळांतर्गत

७४९ सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ७७.३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### अमरावती मंडळांतर्गत

४३३ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात १४६.२४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



# रथ गृहनिर्मितीच्या अमृतमहोत्सवाचा !
# रथ सामाजिक बांधिलकीचा !!
# 'गृहरत्नभूषण'




म्हाडाच्या रथचित्रास 'गृहरत्नभूषण' अशी उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले.

## चित्ररथ संकल्पना
### जानेवारी २०२३

कोरोना महामारी आणि त्यामुळे लागलेल्या टाळेबंदीने आपल्या सर्वांच्याच आयुष्यातील दोन वर्षे हिरावून घेतली. त्यामुळे दोन वर्षांच्या अवकाशानंतर यंदा राज्य शासनाच्या राज शिष्टाचार विभागातर्फे विविध विभागांच्या चित्ररथांचे संचलन दादर येथील शिवाजी पार्क मैदानावर आयोजित करण्यात आले होते. गृहनिर्माण विभागाच्या आदेशानुसार म्हाडाने या संचलनात सहभाग घेतला होता. म्हाडाच्या 'गृहरत्नभूषण' या संकल्पनेवर आधारित चित्ररथाची माहिती, संकल्पना आणि चित्ररथ संकल्पनेचे काव्य वाचकांच्या महितीसाठी मांडण्यात आले आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण म्हणजे म्हाडा परवडणाऱ्या दरातील गृहनिर्मिती करणारी गृहबांधणीच्या क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था लवकरच पंच्याहत्तरीत पदार्पण करणार आहे. १९४९ ते २०२३ असा म्हाडाचा ७४ वर्षांचा प्रवास हा खऱ्या अर्थाने अमृतानुभव कथन करणारा आहे. १९४९ साली स्थापन करण्यात आलेल्या बॉम्बे हौसिंग बोर्डपासून आज आपल्याला परिचीत असलेल्या म्हाडापर्यंतच्या गृहनिर्मितीच्या देदीप्यमान प्रवासात या संस्थेने सामाजिक बांधिलकीचा वसा अविरत जोपासला आहे. गृहनिर्मितीबरोबर म्हाडाची क्षेत्र विकासातील कामगिरीदेखील उल्लेखनीय आहे.

गृहनिर्मितीच्या क्षेत्रातील म्हाडा राज्य शासनाची समन्वयक संस्था असल्याने केंद्र शासनाने आखलेल्या घरांच्या योजनांच्या अंमलबजावणीत म्हाडाची भूमिका कायम पथदर्शी ठरलेली आहे. म्हाडाच्या रथचित्रास 'गृहरत्नभूषण' अशी उपाधी देऊन सन्मानित करण्यात येत आहे. चित्ररथाच्या दर्शनी भागात म्हाडाचा चित्ररथ '७५ वर्षे अविरत सेवेची, गृहस्वप्नपूर्ती जनसामान्यांची' हा संदेश दर्शविण्यात आला आहे. समाजातील शेवटच्या घटकाला हक्काचा निवारा पुरविण्याच्या उद्देशाने म्हाडाने राज्यात सात लाख घरे उभारली आहेत. म्हणून खऱ्या अर्थाने गृहनिर्मितीचा अमृतमहोत्सवच जणू साजरा होताना दिसत आहे.

म्हाडाची घरे बाजारभावापेक्षा कमी दरात म्हणजेच परवडणाऱ्या दरात उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. चित्ररथाच्या सुरुवातीला दिसणारी म्हाडाची इमारत ही गृहनिर्मितीच्या नांदीचे द्योतक आहे. त्याशेजारी असलेले कामगार हे सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीचे कार्य अविरत सुरू ठेवण्याचे आणि गृहनिर्मितीच्या शतकपूर्तीकडे मार्गक्रमण करण्याची कटिबद्धता दाखवत आहे. केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारीदेखील म्हाडा तितक्याच सक्षमतेने उचलत आहे. गृहबांधणीच्या क्षेत्रात राज्यातच नव्हे तर देशात पथदर्शक कामाचा

ठसा उमटवणाऱ्या नऊ विभागीय मंडळे ही म्हाडाची बलस्थाने आहेत. ही विभागीय मंडळे म्हाडाचे स्थान देशातच नव्हे, तर या पृथ्वीतलावर सबळ करण्यास सदैव तत्पर असल्याचा संदेश केंद्रस्थानी ठेऊन हा चित्ररथ चितारण्यात आला आहे. या चित्ररथाच्या शेवटच्या भागात दर्शविण्यात आलेले घर म्हणजे महाड येथील तळिये गावातील ग्रामस्थांसाठी म्हाडाने पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बांधलेले घर आहे. सन २०२१ मध्ये महाड येथील तळिये गावात दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेमुळे सर्वस्व गमावलेल्या ग्रामस्थांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न करुन म्हाडाने या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला आहे. येथील सुमारे २६२ ग्रामस्थांना हक्काचा निवारा निर्माण करून देण्यात आला आहे.







### स्फूर्तिगीत

मान देशाचा,
मान गृहनिर्मितीचा
निर्धार विश्वासाचा,
आधार स्वप्नपूर्तीचा
म्हणजे केवळ म्हाडा... म्हाडा आणि म्हाडाच!

योजना असो राज्याची,
केंद्राची वा प्रधानमंत्र्यांची
हमी मिळते सामाजिक बांधिलकीची
तेव्हा असते केवळ म्हाडा... म्हाडा आणि म्हाडाच!

सात दशकांच्या वाटेत भेटतो परिवार दहा लाखांचा
हाच उत्सव ठरतो अमृताचा
जनसामान्यांच्या स्वप्नपूर्तीचे
एकच असते उत्तर
ते म्हणजे केवळ
म्हाडा... म्हाडा आणि म्हाडाच!

- माया






**वैशाली गडपाले**
मुख्य जनसंपर्क अधिकारी,
म्हाडा

## 'अर्बन व्हिलेज'

# कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्प

मुंबईतील लाल बाजार किंवा रेड लाइट एरिया म्हणून प्रसिद्ध असलेल्या कामाठीपुरा परिसराचा 'अर्बन व्हिलेज' संकल्पनेतून पुनर्विकास करण्यात येणार आहे. 'अर्बन व्हिलेज कामाठीपुरा टाऊनशिप' हा प्रकल्प म्हाडाचा क्षेत्रीय घटक मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे राबविण्यात येत आहे. दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा क्षेत्रातील गल्ली क्रमांक १ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा व भूखंडांचा समूह पुनर्विकास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ विनियम ३३(९) अंतर्गत करण्यात येणार आहे.

गोलपीठासारखे अजरामर साहित्य, पठ्ठे बापूराव यांच्या वग आणि लावण्या, डाव्यांच्या अनेक राजकीय चळवळी, चित्रपट दुनियेतील शाहीर अमर शेख, कैफी आजमी, साहिर लुधियानवी यांच्या अनेक कथा-पटकथा, गाणी, गजलांची ज्या ठिकाणी निर्मिती झाली ते ठिकाण म्हणजे मुंबईतील कामाठीपुरा. तिथे चालणाऱ्या देहव्यापाराने जेवढे हे स्थान बदनाम झाले तेवढेच ते तेथे असलेल्या दिग्गजांच्या वास्तव्याने नावाजलेसुद्धा गेले. त्यामुळेच कामाठीपुरा हे नाव अशा अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार राहिले.

कामाठीपुऱ्याला स्वतंत्र अशी ओळख आहे. या जागेला थोडाथोडका नव्हे तर तब्बल अडीचशे वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. अलीकडच्या काळात हे नाव पुन्हा एकदा चर्चिले जात आहे ते या जागेच्या पुनर्विकासाच्या मुद्द्यामुळे. दक्षिण मुंबईच्या अत्यंत मध्यवर्ती भागात असलेल्या कामाठीपुरा येथील चाळ क्रमांक १ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा व भूखंडांचा समूह पुनर्विकास करण्यात येणार आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, विनियम ३३(९) अंतर्गत म्हाडामार्फत हा पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यानिमित्ताने कामाठीपुराच्या भूत, भविष्य आणि वर्तमानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न आपण या लेखातून करणार आहोत.

मुंबईतील लाल बाजार किंवा रेड लाइट एरिया म्हणून प्रसिद्ध असलेल्या कामाठीपुरा परिसराचा 'अर्बन व्हिलेज' या संकल्पनेतून पुनर्विकास करण्यात येणार आहे. 'अर्बन व्हिलेज कामाठीपुरा टाऊनशिप' असे या प्रकल्पाचे नाव असून म्हाडाचा क्षेत्रीय घटक मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा क्षेत्रातील गल्ली क्रमांक





१ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा व भूखंडांचा समूह पुनर्विकास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ विनियम ३३(९) अंतर्गत करण्यात येणार आहे. येथे जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकर प्राप्त अशा सुमारे ७३४ इमारती आहेत. या इमारतींमध्ये सुमारे सहा हजार ७३ निवासी आणि एक हजार ३४२ अनिवासी गाळे आहेत. या इमारती १०० वर्षांपेक्षा जुन्या असून त्यामध्ये ३४९ बिगर उपकरप्राप्त इमारतींचा समावेश आहे. यात १४ धार्मिक वास्तू, दोन शाळा, चार आरक्षित भूखंड अस्तित्वात आहेत. याव्यतिरिक्त म्हाडाने बांधलेल्या ११ पुनर्रचित इमारतीदेखील आहेत. या भागातील भूखंडांनी व्यापलेले एकूण क्षेत्रफळ सुमारे १,११,६५४ चौरस मीटर (२७.५९ एकर) इतके आहे.

येथील इमारतींचे भूखंड हे अत्यंत छोट्या आकाराचे, अरुंद असून यातील चाळी अत्यंत दाटीवाटीने उभ्या आहेत. त्यामुळे या चाळींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत स्वतंत्ररीत्या करणे शक्य नव्हते. त्यामुळे कामाठीपुरा पुनर्विकास समितीतील जमीन मालक व बहुतांश भाडेकरू यांनी केलेल्या मागणीचा सरकारने सकारात्मक विचार केला. त्यानुसार या क्षेत्रातील नागरी सुविधा व इतर पायाभूत सुविधांचा एकत्रितरीत्या सुयोग्य विकास होण्यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, विनियम ३३(९) अंतर्गत समूह पुनर्विकास करण्यात येणार आहे.

हा प्रकल्प जलद गतीने राबविण्याकरिता तसेच आराखडे व नकाशांना मंजुरी देण्यासाठी शासनातर्फे म्हाडाला सुकाणू अभिकरण व विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे. तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांची प्रकल्प व्यवहार्यता समिती नेमण्यात आली आहे. ही समिती प्रकल्पाच्या क्षेत्राचे निश्चितीकरण, प्रकल्प क्षेत्रातील रहिवाशांचे पात्रता निश्चितीकरण तसेच प्रकल्पास रहिवासी/मालकांची आवश्यक संमती प्राप्त करण्यासाठी काम करणार आहे. कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्प जलदगतीने व योग्यरीत्या राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींसाठी मंजुरी प्रदान करण्यासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीदेखील स्थापन करण्यात आली आहे.

या प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता समूह पुनर्विकास राबविण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाचे चार भागांत विभाजन करून प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे. या पुनर्विकासाच्या माध्यमातून सुमारे आठ हजार २३८ रहिवाशांना किमान ५०० चौरस फुटांच्या सुरक्षीत व अद्ययावत सोयीसुविधांयुक्त सदनिका प्राप्त होणार आहेत. समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून सर्व सोयींनी युक्त अशी वसाहत उभी राहत असल्याने नव्याने



*१९७० आणि १९८० च्या दशकाच्या सुरुवातीस, कामाठीपुरा येथील बच्चू वाडी येथे हाजी मस्तान, करीम लाला आणि दाऊद इब्राहिम यांसारख्या अंडरवर्ल्डमधील टोळीप्रमुखांचा वावरदेखील होता. कालांतराने परिस्थिती बदलत गेली.*

निर्माण होणाऱ्या पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन करण्यात येणार आहे. दक्षिण मुंबईतील सैफी बुऱ्हाणी अपलिफ्टमेंट ट्रस्ट या समूह पुनर्विकास प्रकल्पाच्या धर्तीवर कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. अर्बन व्हिलेज कामाठीपुरा टाऊनशिप हा प्रकल्प राबविण्याकरिता शासनाने इमारत दुरुस्ती मंडळकरिता कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार कामाठीपुरा क्षेत्राचे अचूक क्षेत्र, नकाशे व आराखडे निश्चित करून घेणे, डीपीआर तयार करून त्यास उच्चाधिकार समितीची मान्यता घेणे, तसेच प्रस्तावित आराखडे /नकाशे सुकाणू अभिकरण व विशेष नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी पाठविणे यांसारख्या जबाबदाऱ्या मंडळाकडे सोपविण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत कामाठीपुरा क्षेत्राच्या सर्वेक्षणाचे काम मंडळामार्फत करण्यात येत आहे.

## इतिहास

दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा हा परिसर सर्वात मोठा लाल बाजार किंवा रेड लाइट एरिया म्हणून ओळखला जातो. १७७१ ते १७८४ या काळात बॉम्बे प्रोव्हिन्सचे तत्कालीन गव्हर्नर विल्यम होर्नबी यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील सातही बेटांना जोडणारे मार्ग बांधण्यात आले. या रस्तजोड कार्यांतर्गत महालक्ष्मी येथे ग्रेट ब्रिज उभारण्यात आला, बेलासिस मार्ग माझगावला जोडला गेला. मलबार हिलदेखील कालांतराने जोडले गेले. या रस्ते जोड प्रकल्पामुळे भायखळा, ताडदेव, महालक्ष्मी आणि कामाठीपुरा यासारखे अनेक सखल व पाणथळ प्रदेश वस्तीसाठी खुले झाले. १७७५ पासून देशातील इतर भागांतून व प्रामुख्याने आंध्र प्रदेशातून कामाठी म्हणजेच बांधकाम क्षेत्रातील कामगार मजूर येथे स्थायिक होऊ लागले. ज्या ठिकाणी त्यांनी एकत्रित वस्ती करून राहिले त्या भागाला कामाठीपुरा असे नाव देण्यात आले. कामाठीपुरा हे क्षेत्र उत्तरेला बेलासिस मार्गाने, दक्षिणेला गावदेवीने आणि मुख्य रस्त्याला फॉकलंड मार्गाने वेढलेले होते. ब्रिटिश राजवटीत जिथे सैन्याचा तळ असायचा त्या ठिकाणी लाल बाजार असणे क्रमप्राप्त होते. ब्रिटिश काळात पश्चिम भारतातील सैन्यदलाचे मुख्यालय मुंबई येथे होते. म्हणूनच अगदी १७व्या शतकापासूनच देहविक्री हा व्यवसाय म्हणून केला जाणारा व्यवसाय होता. कामाठीपुरा येथील एक व्यग्र रस्ता ब्रिटीश राजवटीत येथे राहणाऱ्या युरोपियन वंशाच्या महिलांमुळे सफेद गल्ली (पांढरी गल्ली) म्हणून ओळखला जात असे. ही गल्ली आता कर्सेटजी शुक्लाजी स्ट्रीट म्हणून ओळखली जाते. १९७० आणि १९८० च्या दशकाच्या सुरुवातीस कामाठीपुरा येथील बच्चू वाडी येथे हाजी मस्तान, करीम लाला आणि दाऊद इब्राहिम यांसारख्या अंडरवर्ल्डमधील टोळीप्रमुखांचा वावरदेखील होता. कालांतराने परिस्थिती बदलत गेली. अंदाजे १४ गल्ल्यांमध्ये विभागलेला कामाठीपुराचा परिसर, कामगारांच्या पार्श्वभूमीवरदेखील विभागला गेला आहे. येथील बहुतांश कामगार देशातील विविध राज्यांतून स्थायिक झाले आहेत. त्यामुळे सामाजिक संस्थांना त्यांना संघटीत करणे कठीण होते. शिवाय येथे राजकीय नेतृत्व आणि सामाजिक कार्यकर्तृत्वाचा अभाव होता. परिणामतः जनमताचादेखील येथे अभाव दिसून आला. या भागात सुमारे २०० महिलांचा एक छोटासा कुटीर उद्योगदेखील आहे, जो उदरनिर्वाहासाठी रोलिंग बीडी (हाताने रोल केलेली भारतीय सिगारेट) बनवतात.



# १५ अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारती



**यंदाच्या वर्षी जाहीर केलेल्या १५ अतिधोकादायक इमारतींची यादी**

१ इमारत क्रमांक ४-४ ए, नवरोजी हिल रोड क्र. १, जॉली चेंबर (मागील वर्षीच्या यादीतील)
२ इमारत क्रमांक ७४ निझाम स्ट्रीट (मागील वर्षीच्या यादीतील)
३ इमारत क्रमांक ४२, मस्जिद स्ट्रीट (मागील वर्षीच्या यादीतील)
४ इमारत क्रमांक ६१-६१ ए, मस्जिद स्ट्रीट
५ इमारत क्रमांक २१२ जे, पांजरपोळ लेन
६ इमारत क्रमांक १७३-१७५-१७९ व्ही. के. बिल्डिंग, प्रिन्सेस स्ट्रीट, काळबादेवी
७ इमारत क्रमांक २-४-६ नानुभाई देसाई रोड, मुंबई
८ इमारत क्रमांक १-२३ नानुभाई देसाई रोड, मुंबई
९ इमारत क्रमांक ३५१ ए, जे एस एस रोड, मुंबई
१० इमारत क्रमांक ३८७-३९१ बदामवाडी, व्ही .पी. रोड (मागील वर्षीच्या यादीतील)
११ इमारत क्रमांक १७ नारायण निवास, निकटवाडी
१२ इमारत क्रमांक ३१ सी व ३३ ए, आर. रांगणेकर मार्ग व १९ पुरंदरे मार्ग, गिरगाव चौपाटी (मागील वर्षीच्या यादीतील)
१३ इमारत क्रमांक १०४-१०६ , मेघजी बिल्डिंग, अ, ब, क विंग, शिवदास चापसी मार्ग (मागील वर्षीच्या यादीतील)
१४ इमारत क्रमांक ४०, कामाठीपुरा चौथी गल्ली
१५ अंतिम भूखंड क्र. ७२१ व ७२४ टीपीएस-३ विभाग, इमारत क्रमांक ४० बी व ४२८, आत्माराम बिल्डिंग व पेनकर चाळ (मागील वर्षीच्या यादीतील)

**मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचा नियंत्रण कक्ष**
रजनी महल, पहिला मजला, ८९-९५, ताडदेव रोड, ताडदेव, मुंबई-४०००३४.
दूरध्वनी क्रमांक - २३५३६९४५, २३५१७४२३. भ्रमणध्वनी क्रमांक - ९३२१६३७६९९ मुंबई महानगरपालिकेचा नियंत्रण कक्ष पालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई. दूरध्वनी क्रमांक २२६९४७२५/२७

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे नियमित पावसाळापूर्व सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. यावर्षीच्या सर्वेक्षणात १५ इमारती अतिधोकादायक आढळल्या आहेत. या १५ इमारतींमध्ये मागच्या वर्षी अतिधोकादायक घोषीत केलेल्या सात इमारतींचा समावेश आहे.

या अतिधोकदायक उपकरप्राप्त इमारतींमध्ये ४२४ निवासी व १२१ अनिवासी असे एकूण ५४५ रहिवासी/भाडेकरू आहेत. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीनुसार १५५ निवासी रहिवासी/भाडेकरूंनी स्वतःच्या निवाऱ्याची पर्यायी व्यवस्था केली आहे तर आतापर्यंत २१ रहिवाशांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित करण्यात आले आहे. उर्वरित इमारतींमधील रहिवासी/भाडेकरू यांना निष्कासनाच्या सूचना देण्यात आल्या असून गाळे खाली करुन घेण्याची कार्यवाही मंडळातर्फे सुरू आहे. तसेच २२२ निवासी रहिवासी/भाडेकरूंची संक्रमण शिबिरात व्यवस्था करावी लागणार असल्याने मंडळातर्फे तसे नियोजन करण्यात आले आहे. याकरिता मंडळातर्फे संक्रमण शिबिरांत त्यांची पर्यायी व्यवस्था कारण्याबाबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. अतिधोकादायक इमारतींतील रहिवासी/भाडेकरूंनी मंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार इमारती रिक्त करण्याकामी सहकार्य करावे व स्वतःच्या व आपल्या परिजनांच्या सुरक्षेकरिता दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. रहिवाशांनी सहकार्य केल्यास अपघात होऊन होणारी जीवित व वित्तहानी टाळता येऊ शकते. मंडळाचा नियंत्रण कक्ष अहोरात्र कार्यरत असल्याने इमारतीमध्ये कोणतीही धोक्याची लक्षणे तथा अपघात घडल्यास नियंत्रण कक्षास सूचीत करण्यात यावे, असे आवाहन देखील मंडळातर्फे करण्यात येत आहे.







# म्हाडा महिला दिन विशेष



८ मार्च
























महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)
तर्फे
जागतिक महिला दिन कार्यक्रम
या विषयावर म्हाडातील महिलांकरिता विशेष कार्यक्रम
दिनांक : १९ मार्च २०२३
स्थळ: रंगशारदा नाट्यगृह , वांद्रे पश्चिम
प्रमुख उपस्थिती





## बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिल

# ४१८ गिरणी कामगारांना सदनिकांच्या चाव्यांचे वाटप



**हेमंत पाटील**
जनसंपर्क अधिकारी, म्हाडा



ठाणे जिल्हयात विविध ठिकाणी ४३ हजार हेक्टर जागेवर गिरणी कामगारांसाठी घरे उभारण्याकरिता शासन प्रयत्नशील!

**श्री. एकनाथ शिंदे,**
- मुख्यमंत्री

गिरणी कामगारांना गिरण्यांच्या जागेवरच घरे देण्याचा महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न आहे. मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी उपलब्ध होणाऱ्या घरांची मर्यादित संख्या विचारात घेता गिरणी कामगारांना अधिकाधिक घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनातर्फे ठाणे जिल्ह्यात विविध ठिकाणी ४३ हजार हेक्टर जागा शोधण्यात आली आहे. या जागेवर सदनिका उभारण्यासाठी चाचपणी करण्यात येत असून त्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केले.

सह्याद्री अतिथिगृह येथे म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे सन २०२० मध्ये गिरणी कामगारांसाठी जाहीर सोडतीतील बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलमधील पात्र व सदनिकेच्या विक्री किमतीचा, मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या यशस्वी गिरणी कामगार/वारस यांना दोन टप्प्यांत सदनिकांच्या चाव्या व वितरणपत्राचे वाटप करण्यात आले. पहिल्या टप्प्यांतर्गत दि. १५ जून, २०२३ रोजी १६७ यशस्वी गिरणी कामगार / वारस यांना तर दुसऱ्या टप्प्यांतर्गत दि. ०७ जुलै, २०२३ रोजी २५१ यशस्वी गिरणी कामगार / वारस यांना सदनिकांच्या चाव्या व वितरणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) व गिरणी कामगार घर संनियंत्रण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला व्यासपीठावर राज्याचे कामगार मंत्री श्री. सुरेश खाडे, मंत्री श्री. अब्दुल सत्तार, आमदार श्री. प्रवीण दरेकर, गिरणी कामगार घर संनियंत्रण समितीचे अध्यक्ष व आमदार श्री. सुनील राणे, आमदार श्री. कालिदास कोळंबकर, आमदार श्री. प्रकाश आबिटकर, आमदार श्री. अभिमन्यु पवार, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर सिंह, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल, मुंबई मंडळाचे मुख्य





अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, सहमुख्य अधिकारी श्रीमती नीलिमा धायगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.


श्री. शिंदे म्हणाले की, दि. १५ जून, २०२३ रोजी पहिल्या टप्प्यांतर्गत १६७ पात्र यशस्वी गिरणी कामगार / वारस यांना सदनिकांच्या चाव्या व वितरणपत्र वाटप करण्यात आले होते. त्यानंतर २० दिवसांत चावी वाटपाचा दुसरा टप्पा पार पडत असल्याने आनंद वाटत आहे. पात्र गिरणी कामगारांना घरांचा ताबा देण्याची गती यापुढेही कायम ठेवली जाणार आहे. घर मिळण्यास विलंब होऊ नये यासाठी गिरणी कामगारांची जशी पात्रता निश्चित होईल तसे चावी वाटपाचे कार्यक्रम यापुढे देखील घेण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी आश्वासीत केले.

उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, गिरणी कामगारांना हक्काची घरे लवकर मिळावीत यासाठी संनियंत्रण समिती नेमण्यात आली आहे. गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करण्याच्या आणि घरे वाटप करण्याच्या कामाला गती मिळाली आहे. गिरणी कामगार/वारस यांची पात्रता निश्चित करून दर आठवड्याला घरांचा ताबा नियमितपणे दिला जाणार आहे. मौजे कोन येथील एमएमआरडीएने बांधलेल्या सदनिकांच्या दुरुस्तीचे काम सुरू असून लवकरच दुरुस्ती पूर्ण करून घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. ठाणे जिल्ह्यात विविध पाच ठिकाणी ४३ हेक्टर जमिनीची पाहणी करण्यात आली असून संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून कोणत्या जागेवर घरांची उभारणी शक्य आहे या बाबतचा अहवाल मागविला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. बंद पडलेल्या गिरण्यांच्या जागेवर तयार होणाऱ्या घरांसाठी अर्ज केलेल्या एकूण १,५०,००० गिरणी कामगारांची दुबार नावे आहेत. कामगार आयुक्तांना उर्वरित गिरणी कामगारांची पात्रता निश्चिती अगोदर करण्याचे निर्देश दिले असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले. पात्र गिरणी कामगार/ वारसांना घरांची उपलब्धता व्हावी यासाठी शासन गांभीर्याने पावले उचलत असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, की मुंबई आणि गिरणी कामगारांचे आगळेवेगळे नाते आहे. मुंबईच्या विकासासाठी गिरणी कामगारांनी अतोनात कष्ट घेतले आहेत. मुंबईबरोबरच देशाच्या जडणघडणीत तसेच राजकीय, सामाजिक चळवळीत या कामगारांचे मोठे योगदान आहे. घर हा जगण्याचा आधार असतो, नात्यांचा ओलावा असतो. त्याच अनुषंगाने स्वतःचे घर हा गिरणी कामगारांचा हक्क असून त्यांना घरांच्या चाव्या दिल्या जात आहेत याचे वेगळे समाधान आहे. गिरणी कामगारांसाठी शासनामार्फत मोठ्या प्रमाणात घरांची निर्मिती केली जात आहे. त्याचबरोबर विविध योजनांच्या माध्यमातून सर्वांना घरे उपलब्ध करून देण्यात येत असून सर्वांना घरे मिळावीत यासाठी प्रयत्नरत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

श्री. सुनील राणे म्हणाले, रायगड जिल्ह्यातील मौजे कोन (ता. पनवेल) येथील २४१७ सदनिकांची सोडत दि. २ डिसेंबर २०१६ रोजी काढण्यात आली. या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या गिरणी कामगारांपैकी सुमारे ४०० गिरणी कामगारांनी सदनिकेच्या विक्री किमतीचा भरणा केलेला आहे. या सदनिकांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. सदनिका दुरुस्त झाल्यावर तत्काळ ताबा दिला जाणार आहे. कोन पनवेल येथील सदनिकांच्या बाजूला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) बांधलेल्या २५०० सदनिका गिरणी कामगारांसाठी उपलब्ध करून देण्याविषयी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) यांच्या ३५० चौरस फुट चटई क्षेत्रफळाच्या १० हजार सदनिका तयार असून सदर सदनिकांची विक्री किंमत निश्चित झाल्यानंतर व गिरणी कामगार संघटनेने पसंती दर्शविल्यानंतर या सदनिका गिरणी कामगारांसाठी उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच ठाणे जिल्ह्यातील रायचूर व रायगड जिल्ह्यातील कोल्हे येथील २५२१ सदनिकांची सोडत लवकरच काढण्याचा विचार असल्याचे श्री. राणे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत धात्रक, उपमुख्य अधिकारी श्री. योगेश महाजन, मिळकत व्यवस्थापक श्री. रामचंद्र भोसले आदींसह अधिकारी - कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.








## तळीयेतील दरडग्रस्तांकरिता म्हाडाची सामाजिक बांधिलकी

# दोनशे ग्रामस्थांचे करणार पुनर्वसन







## वैशाली गडपाले

**मुख्य जनसंपर्क अधिकारी, म्हाडा**

१९९३ साली झालेल्या प्रलयकारी भूकंपामुळे उध्वस्त झालेल्या लातूर जिल्ह्यातील किल्लारी गावाचे पुनर्वसन म्हाडाच्या माध्यमातून करण्यात आले होते. यातूनच म्हाडाच्या सामाजिक बांधिलकीची नाळ जनसामान्यांच्या गृहप्रश्नाशी अधिक घट्ट झाली होती. राज्य शासनाने रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये गावातील दरडग्रस्त ग्रामस्थांच्या पुनर्वसनाची जबाबदारी म्हाडाकडे सोपविली आणि या आठवणी ताज्या झाल्या.

२२ जुलै २०२१ मध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. त्यात डोंगरपायथ्याशी वसलेल्या तळीये गावावर दरड कोसळली आणि संपूर्ण गाव उध्वस्त झाले. या दुर्घटनेत तळीये गाव आणि शेजारील पाड्यांचे मोठे नुकसान झाले. दुर्घटनाग्रस्त ग्रामस्थांच्या पुनर्वसनाची जबाबदारी राज्य शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे सोपविली आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाकडे देण्यात आली आहे. तळीये पुनर्वसन प्रकल्पाच्या माध्यमातून ६६ दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांसाठी व सभोवतालच्या इतर सहा पाड्यांतील ग्रामस्थांसाठी म्हाडातर्फे २६३ स्वतंत्र घरे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जून २०२२ पासून पुनर्वसन प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

पुनर्वसन प्रकल्पाच्या उभारणीकरिता दुर्घटनाग्रस्त ठिकाणाच्या जवळच जिल्हाधिकारी कार्यालयाने १७ हेक्टर जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेवर २६३ पैकी २३१ घरे उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. उर्वरित ३२ घरांच्या बांधकामासाठी लवकरच शासनाकडून जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने उपलब्ध करून दिलेली जागा ही डोंगरमाथ्यावर असल्याने केंद्र शासनातर्फे या जागेचे भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. तसेच आयआयटी पवई या संस्थेने सदनिकांच्या बांधकामाचे डिझाईन प्रमाणित करून दिले आहे. प्रत्येकी तीन हजार चौरस फुटांच्या भूखंडावर ६०० चौरस फूट चटई क्षेत्रफळ (Carpet Area) आकारमानाचे स्वतंत्र घर अत्याधुनिक प्री फॅब स्टील स्ट्रक्चर, काँक्रिट सँडविच वॉल पॅनल सिस्टीम वापरून बांधण्यात येणार आहे. टू-बीएचके स्वरूपाचे हे स्वतंत्र घर असणार आहे. पुनर्वसित घरे भूकंपरोधक पद्धतीने उभारण्यात येणार आहेत. अत्याधुनिक सोयींनी युक्त स्वतंत्र घरामध्ये पाण्याची टाकी आणि सौरऊर्जेच्या पॅनल्सचीही सोय करून देण्यात आली आहे. त्याबरोबरच सांडपाण्याची सोय आणि सेप्टीक टँकदेखील बांधण्याचे नियोजन आहे. घरांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीकरिता इतर यंत्रणादेखील खारीचा वाटा उचलणार असून जिल्हा परिषदेतर्फे प्रकल्पाकरिता पाणीपुरवठा, सांडपाणी, गटारे, रस्ते, पथदिवे इत्यादी नागरी सुविधांचे नियोजन करण्यात येणार आहे. महावितरणतर्फे वीजपुरवठा केला जाणार असून वनविभागातर्फे वृक्षारोपण केले जाणार आहे. तळीये दरडग्रस्त ग्रामस्थांसाठी पुनर्वसन प्रकल्प राबविताना म्हाडातर्फे गावपण जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यासोबतच ग्रामस्थांकरिता आधुनिक सोयीसुविधांनी युक्त घर देण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रकल्पाचे ठिकाण भौगोलिकदृष्ट्या समुद्रसपाटीपासून अतिउंचावर असल्याने पावसाळ्यामध्ये प्रकल्पाचे काम करणे शक्य होत नव्हते आणि इतर वेळेसदेखील बांधकाम साहित्य टेकडीवर चढविण्यास अनेक अडचणी येत असल्याने प्रकल्पाचे काम वेग घेऊ शकले नाही; परंतु सद्यस्थितीत ग्रामस्थांच्या अडचणी लक्षात घेता त्यांचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्यास म्हाडा कटिबद्ध आहे. 'सामाजिक बांधिलकी' या तत्त्वावर तळीये पुनर्वसन प्रकल्पाचे काम म्हाडाच्या निधीतून केले जात आहे. प्रकल्प राबवताना म्हाडातर्फे गावपण जपण्याचा प्रयत्न करण्यात आला असून ग्रामस्थांना आधुनिक सोयीसुविधांनी युक्त घर देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### तळीये पुनर्वसन प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- १७.६४ हेक्टर जमिनीवर प्रकल्प
- २६३ स्वतंत्र घरांच्या बांधकामाचे नियोजन
- २०० घरांचे बांधकाम प्रगतिपथावर
- नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यास अनुकूल घरे
- भूकंप रोधक घरांची निर्मिती
- तापमानाचे संतुलन राखण्यासाठी एफ पॅनेलचा घरांच्या छतासाठी वापर
- प्रत्येक घरासाठी सौरऊर्जेचे पॅनेल
- प्रत्येकी ३००० चौरस फुटांच्या भूखंडावर ६०० चौरस फूट चटई क्षेत्रफळ आकारमानाचे स्वतंत्र घर
- दोन बेडरूम, एक हॉल, किचनसह शौचालय व न्हाणीघराची सोय
- घराच्या चारही बाजूला चार फुटांची पडवी



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे वाचावे?



एस.के. भंडारे

समाज विकास अधिकारी, मुंबई मंडळ

**एस. के. भंडारे हे म्हाडामध्ये समाज विकास अधिकारी म्हणून कार्यरत असून ते युनियनचे कार्यकर्तेदेखील आहेत. त्यांनी 'दुखःमुक्ती', 'प्रश्नोत्तरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर' ही दोन पुस्तके लिहिली असून त्यांनी नुकतीच कायद्याची पदवी घेतली आहे. ते 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेची क्रांती कशी केली?' या विषयावर पीएचडी करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खूप मोठे योगदान आहे. ते सर्वांना समजण्यासाठी त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे वाचावे?' या शीर्षकाखाली ही मांडणी केली आहे.**

# भाग 1 : भारताचे सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य संदर्भ

01. Castes in India : Their Mechanism, Genesis and Development खंड-1 (भारतातील जाती, त्यांची घडण, उत्पत्ती आणि विकास) दि. 09/05/1916
02. Who are the Shudras? How they came to be the fouth Varna in खंड-7 indo-Aryan Varna (शूद्र पूर्वी कोण होते?) दि. 10/10/1946
03. The Untouchables : Who were they and why they became खंड-7(2) Untouchbles? (अस्पृश्य: ते पूर्वी कोण होते आणि ते कोणत्या कारणामुळे अस्पृश्य झाले) ऑक्टोबर 1948
04. The Mahars : Who were they and how they became the Untouchables?खंड-17(Part Two(21) (महार : ते पूर्वी कोण होते आणि ते कोणत्या कारणामुळे अस्पृश्य झाले?)
05. Untouchables and Untouchbility Social-Political-Religious खंड-5 (अस्पृश्य आणि अस्पृश्यता : सामाजिक -राजकीय – धार्मिक) U.W.
06. Philosophy of Hinduism (हिंदुत्वाचे तत्त्वज्ञान) U.W. खंड-3 (Part I)
07. Manu and Shudras, with the Hindus, which is worse slavery or खंड-12(Part VI) untouchblity, etc. (मनु आणि शूद्र, हिंदु बरोबर, गुलामगीरी किंवा अस्पृश्यता पैकी कोणती खराब आहे इ.) U.W.
08. Revolution and Counter Revolution inancient India (Unpublished) खंड-3 (Part III) (प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती) U.W.
09. The Untouchables and Pax Britannica (अस्पृश्य आणि ब्रिटिश शांतता) U.W.खंड-12 (Part II)
10. चवदारतळे सत्याग्रह (दि. 19,20 मार्च 1927) बहिष्कृत भारत 3/4/1927,20/5/1927खंड-17Part One, 18(7)
11. मनुस्मृती दहन का केली (दि. 25/12/1927) बहिष्कृत भारत – 3/2/1928 खंड-18-1(17)
12. काळाराम मंदिर सत्याग्रह (दि. 02/03/1930 ते 13/10/1935) खंड-17Part One, (1)
13. The Riddles in Hinduism (हिंदुत्वातील कुट प्रश्न) डिसेंबर 1954 खंड-4
14. Annihilation of Castes with A Reply to Mahatma Gandhi खंड-1(2) (जाती व्यवस्थेचे निर्मुलन, महात्मा गांधी यांना दिलेल्या उत्तरासह) दि. 15/05/1936 म.शा. 2013 म., 2015इं
15. The Rise and Fall of Hindu Women (हिंदु स्त्रियांची उन्नती व अवनीती) 1950 खंड-17Part Two,(18)
16. मुक्ती कोण पथे (दि. 31/05/1936) खंड-18 भाग-3(89)
17. What Congress and Gandhi Have Done to the Untouchables (कॉंग्रेस आणि खंड-9 गांधी यांनी अस्पृश्यासाठी काय केले?), Mr. Gandhi and the Emancipation of the Untouchables (गांधी आणि अस्पृश्यजनांचे बंध विमोचन) जुन 1945
18. Hindu Code Bill (हिंदु कोडबील) दि. 17/11/1947 – 14/12/1950, 5/2/1951-खंड-14 25/9/1951
19. The Buddha Dhamma will be the Sovior of the World (बुद्ध धर्मनेच जगाचा उद्धार होणार आहे खंड-18 भाग-3(342)) दि. 15/10/1956
20. Buddha or Karl Marx (बुद्ध की कार्ल मार्क्स) दि. 20/11/1956खंड-3,17(159), 18 भाग-3(347)
21. The Buddha and His Dhamma (बुद्ध आणि त्यांचा धम्म) दि. 05/12/1956खंड-11
22. The Constituion of India (भारताचे संविधान) - कलम 12 ते 35, 51क, 244, 330 ते 342

# भाग 2 : भारताचे राजकीय स्वातंत्र्य

23. Evidance Before The Southborough Committee on Franchise खंड-1(7) (साऊथबरो कमिशन समोर साक्ष) दि. 27/01/1919
24. Report on the Constitution of the Government of Bombay Presidency खंड-2(Part II) (सायमन कमिशनसमोर साक्ष इ.) दि. 23/10/1928
25. The Round Table Conferrences for future consitution of a self खंड-2(Part III) governing India (गोलमेज परिषदा) दि. 20/11/1930-3/11/1933खंड-2(Part III)(4) (2) Whole Conference (3) Provincial Constitution (4,10) Minorities, Safeguards of the Depressed classes (5) Franchise (6) Defence (7) Services (8) General Review (9) Federal Structure (11) Indian Constitutional Reform
26. Poona-Pact (पूणे करार) दि. 24/9/1932खंड-1(Appx-II,III) खंड-17(Appx-IV,V,VI)
27. Federation Versus Freedom (संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य) दि. 29/01/1939 खंड-1(8)
28. Lectures on the English Constitution (ब्रिटिश संविधानावरील भाषण) U.W.खंड-12 (Part III)
29. The Constituion of British India, Notes on Parliamentary Procedureखंड-12(Part VI) (ब्रिटीश भारताचे संविधान, संसदीय कार्यपद्धतीवरील टिप्पणी) U.W.
30. Pakistan or The Partition of India (पाकिस्तान अथवा भारताची फाळणी) दि. 27/12/1940खंड-8
31. Ranade, Gandhi and Jinnha (रानडे, गांधी आणि जीना दि. 18/01/1940 – 15/03/1943)खंड-1(6)
32. Communal Deadblock and Way to Solve it (जातीयपेच आणि तो सोडविण्याचा मार्ग खंड-1(9)) दि. 06/05/1945
33. The Cabinet Mission and the Untouchables (ब्रिटिश सरकारच्या कॅबिनेट मिशनशी चर्चा खंड-10(Part-II Sec.3)) दि. 10/01/1946खंड-17 Part Two(II)
34. Building of Nation and its Democracy (देशाची बांधणी व त्याची लोकशाही)खंड-17 Part Two(III)
35. States and Minorities – What are their Rights and how to Secure the mine खंड-1(10) the Constitution of Free India (संस्थाने आणि अल्पसंख्याक) दि. 15/03/1947
36. Maharashtra Linguistic Province (महाराष्ट्र : एक भाषिक प्रांत) दि. 14/10/1948 खंड-1(3)
37. Need for Checks and Balances (नियंत्रण समतोलाची गरज) दि. 23/04/1953खंड-1(4)
38. Thought on Linguistic States (भाषिक राज्यासंबंधी विचार) दि. 23/12/1955खंड-1(5)
39. First Speech in Constituion Assembly (संविधान सभेतील पहिले भाषण) दि. 17/12/1946O.R. Vol-I
40. Last Speech in Constituion Assembly (संविधान सभेतील अंतिम भाषण) दि. 25/11/1949O.R. Vol-XI
41. The Constituion of India (भारताचे संविधान) - कलम 1 ते 11, 52 ते 111, 168 ते 201, 239 ते 263, 308 ते 313, 324 ते 329, 343 ते 347, 352 ते 360, 361 ते 368

# भाग 3 : भारताचे आर्थिक स्वातंत्र्य

42. Administration and Finance of the East India Company Economy खंड-6 म. अनुवाद (ईस्ट इंडिया कंपनी : प्रशासन आणि अर्थनिती दि. 15/05/1915) 25व्या वर्षी
43. Ancient Indian Commerce (प्राचीन भारतातील व्यापार) 1915 खंड-12 (PartI)
44. Small Holdings in India and their Remedies (भारतातील लहान खंड-1(11) शेतजमिनी आणि त्यावरील उपाय) 1918
45. The Present problem in Indian Currency (भारतीय चलनाचा वर्तमान प्रश्न) खंड-6 बुक 4
46. The Evolution of Provincial Finance in British India – A Study in the खंड-6 बुक 2 Provincial Decentralization of Imperial Finance in British India खंड-6 वि. दोन मराठी (ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्त व्यवस्थेची उत्क्रांती - ब्रिटिशकालीन भारतातील साम्राज्याच्या अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण एक अभ्यास 1916)
47. The Problem of the Rupee – It's Origin and its Solution खंड-6 बुक3 (रुपयाचा प्रश्न : उगम आणि उपाय) दि. 28/06/1922खंड-6 वि.तीन मराठी
48. Mr Russell and the Reconstruction of Society खंड-1(12) (रसेल आणि समाजाची पुनर्रचना) 1918
49. Statement of Evidence to the Royal Commission on Indian Currency खंड-6 बुक 4 (भारतीय चलनाच्या रॉयल कमिशनला दिलेले पुराव्याचे विवरण) 1924-25 खंड-6 वि.चार मराठी
50. The Constituion of India (भारताचे संविधान) -कलम 112 ते 117, 148 ते 151, 202 ते 207, 264 ते 307

## खंड –

महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषण खंड,

U.W. – Unpublished Writings,
म. शा.- महाराष्ट्र शासन
म.- मराठी,
इं – इंग्रजी,
O.R. – Official Report of Govt of India,
वि.- विभाग

## म्हाडा उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांचे आदेश

# माहीमच्या जसोदा इमारतींचा रखडलेला पुनर्विकास विकासकाने तात्काळ सुरू करावा

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे माहीम येथील जसोदा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दोन उपकरप्राप्त इमारतींचा नऊ वर्षांपासून रखडलेला पुनर्विकास प्रकल्प येत्या पंधरा दिवसांत सुरू करण्याकरिता म्हाड सुधारित अधिनियमातील कलम ९१-अ अंतर्गत विकासकाला नोटिस बजावण्यात आली आहे. संबंधित विकासकाने या नोटीशीनुसार कार्यवाही न केल्यास इमारतींचे संपादन (Acquisition) करून पुनर्विकास प्रकल्प 'म्हाडा'च्या माध्यमातून राबविण्यासाठी येत्या १५ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत.

*१५ दिवसांत पुनर्विकासाचे काम सुरू न केल्यास ९१-अ अंतर्गत इमारतींच्या संपादनासाठी १५ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश*

सदर उपकरप्राप्त इमारतींचा रखडलेला पुनर्विकास मार्गी लागावा, यासाठी इमारतीतील रहिवाशांनी श्री. संजीव जयस्वाल यांची 'म्हाडा'च्या वांद्रे (पूर्व) येथील मुख्यालयात भेट घेतली. यावेळी रहिवासी तसेच मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांसह बैठक झाली. या बैठकीत श्री. जयस्वाल यांनी सदर निर्देश दिले. जसोदा इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात विकासकाने ठोस पावले उचलण्याची शक्यता नसल्याचे बैठकीदरम्यान निदर्शनास आले. इमारतीतील रहिवाशांनी म्हाडामार्फत पुनर्विकास प्रकल्प राबविण्यास सहमती दर्शविली असल्याने श्री. जयस्वाल यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

बैठकीत श्री. जयस्वाल म्हणाले की, 'म्हाडा'च्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास सुधारणा अधिनियमानुसार म्हाड ॲक्ट - १९७६ मध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या कलम ९१-अ नुसार, विकासकाला २७ जुलै, २०२३ रोजी नोटीस बजावली आहे. या इमारतींचा पुनर्विकास विकासकाने अनेक वर्षे रखडविला असून भाडेकरू/ रहिवासी यांच्या तात्पुरत्या निवासाची व्यवस्था देखील केलेली नाही. तसेच अनेक वर्षांपासून या इमारतीतील भाडेकरूंचे भाडेदेखील थकविले आहे. त्यामुळे इमारतीतील भाडेकरू/रहिवासी हक्काच्या घरापासून वंचित राहिले व त्यांना आर्थिक अडचणींचाही सामना करावा लागत असल्याचे या नोटीसीत नमूद करण्यात आले आहे. सदर नोटीस प्राप्त झाल्यावर विकासकाने १५ दिवसांत पुनर्विकासाचे काम सुरू करावे व भाडेकरू/रहिवासी यांचे थकीत भाडेदेखील द्यावे, अशी तंबी देण्यात आली आहे. विकासकाला १५ दिवसांत म्हणणे मांडण्याचीही संधी देण्यात आली असून विकासकाने नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांत पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरू न केल्यास तसेच थकलेले भाडे रहिवाशांना न



दिल्यास नोटीस बजावल्यापासून ३० दिवसांत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या दोन्ही इमारतींची मालमत्ता व अर्धवट अवस्थेतील पुनर्विकासित इमारत ताब्यात घेण्याची कार्यवाही करेल, असेही नोटीसद्वारे विकासकाला कळविल्याचे श्री. जयस्वाल यांनी रहिवाशांना सांगितले. जसोदा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अखत्यारीतील या दोन्ही उपकरप्राप्त इमारती 'अ' वर्गातील म्हणजेच सन १९४० पूर्वीच्या होत्या. या इमारतीत एकूण ४९ निवासी सदनिका होत्या. १९ ऑक्टोबर २०१३ रोजी या दोन उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास मे. मात्रा रियालिटी व डेव्हलपर यांच्यामार्फत करण्यासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) नुसार ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) दिले आहे. नवीन इमारतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने १० ऑक्टोबर २०१४ रोजी आयओडी व नकाशांना मान्यता दिली. मात्र, पुनर्विकासाची जबाबदारी असलेल्या संबंधीत विकासकाने इमारतीतील ४९ भाडेकरू/ रहिवासी यांचे भाडे थकविल्यामुळे व पुनर्विकासाचे काम अपूर्ण केल्यामुळे सन २०१८- २०१९ मध्ये विकासकाला पुनर्विकासासाठी दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी मंडळाकडे तक्रार केली होती. त्यानुषंगाने सन २०२२ मध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी विकासकाने इमारतीतील सर्व भाडेकरू/रहिवासी यांचे गेल्या सहा महिन्यातील थकीत भाडे द्यावे व रखडलेल्या पुनर्विकासाचे काम तत्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले. मात्र, तरीही संबंधित विकासकाने काहीही कार्यवाही केलेली नाही, असे इमारतीतील भाडेकरू/ रहिवासी यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास सुधारणा अधिनियमानुसार म्हाड ॲक्ट - १९७६ मध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या कलम ९१-अ नुसार जसोदा इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प पथदर्शी प्रकल्प ठरेल, अशी मंडळातर्फे आशा व्यक्त केली जात आहे.

# सोलापूरमधील रे नगर गृहनिर्माण प्रकल्प : पहिल्या टप्प्यातील १५ हजार सदनिकांची उभारणी करा : श्री. संजीव जयस्वाल

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ३० हजार असंघटित श्रमिक कामगारांकरिता सोलापूरमधील रे नगर येथे उभारण्यात येणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या एकात्मिक पथदर्शी गृहनिर्माण प्रकल्पाचा 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी आढावा घेतला. दरम्यान या पहिल्या टप्प्यातील १५ हजार सदनिकांच्या उभारणीचे काम नोव्हेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

*रे नगर येथे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाची व्याप्ती पाहता हा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत तयार होणारा देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे.*

या गृहनिर्माण प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात उभारण्यात येणाऱ्या सदनिकांचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नोव्हेंबर २०२३च्या अखेरपर्यंत वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच याच प्रकल्पांतर्गत दुसऱ्या टप्प्यातील उर्वरित सदनिकांच्या उभारणीचे काम मार्च २०२६ ऐवजी डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी शासनाकडून निधी मिळविण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात झालेल्या या बैठकीला माजी आमदार श्री. नरसैया आडम, केंद्रीय गृहनिर्माण व दारिद्र्य निर्मूलन विभागाचे उपसचिव श्री. एस. के. बब्बर, सोलापूरचे जिल्हाधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, म्हाडाचे मुख्य अभियंता-२ श्री. सुनील जाधव, श्री. शिवकुमार आडे, रे नगर फेडरेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. दोन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या उभारणीत येणाऱ्या अडचणी त्यांनी यावेळी श्री. आडम, प्रकल्प विकासक आणि रे नगर फेडरेशनच्या सभासदांकडून जाणून घेतल्या. याप्रसंगी श्री. आडम यांनी श्री. जयस्वाल यांचा शाल व विठ्ठल-रखूमाईची मूर्ती देऊन सत्कार केला. राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या गृह प्रकल्पांच्या समन्वयासाठी म्हाडा सुकाणू अभिकरण म्हणून काम पाहते व प्रधानमंत्री आवास योजनांचे राज्यस्तरावर नियंत्रण करण्यासाठी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी हे राज्य अभियान संचलनालयाच्या अभियान संचालकपदी आहेत. श्री. जयस्वाल पुढे म्हणाले की, या प्रकल्पाचे लाभार्थी हे असंघटित कामगार असल्याने त्यांच्या आर्थिक अडचणी समजून घेऊन कर्ज वितरणाबाबत काही अटी व शर्ती शिथिल करण्याचे पर्याय उपलब्ध करून द्यायला हवेत. त्याकरीता केंद्र शासनाकडून पाठपुरावा करण्याबाबत श्री. बब्बर यांना त्यांनी सांगितले. प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांच्या नियोजनाचा देखील त्यांनी यावेळी आढावा घेतला. रस्ते, पथदिवे, पिण्याच्या पाण्याची जोडणी, सांडपाणी व्यवस्थापन, विद्युत पुरवठा या सुविधांच्या उभारणीकरिता येणाऱ्या अडचणींचे तत्काळ निवारण करण्याचे आदेश संबंधित जिल्हयाधिकाऱ्यांना दिले.





श्री. आडम यांनी स्थानिक शाळेबाबत प्रश्न उपस्थित केला असता श्री. जयस्वाल यांनी शाळेच्या इमारत उभारणीस वेळ लागत असल्यास तात्पुरत्या स्वरूपातील इमारतीची उभारणी करण्याचे निर्देश दिले. तसेच श्री. आडम यांच्या मागणीनुसार श्री. जयस्वाल यांनी प्रकल्प स्थळी पोहचण्याकरिता रस्ता उभारण्यासाठी भूसंपादन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. याबाबत श्री. जयस्वाल म्हणाले की, याकामी राज्य सरकारकडून अर्थसाह्य मिळते का याबाबत चाचपणी करण्याचे आदेश दिले आहेत. शिवाय या कामाकरीता म्हाडादेखील चार कोटी रुपयांपर्यंत मदत करेल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

श्री. जयस्वाल पुढे म्हणाले की, रे नगर येथे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाची व्याप्ती पाहता हा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत तयार होणारा देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. त्यामुळे नगर परिषदेचा दर्जा प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना संगितले. तसेच वनीकरण विभागाच्या सहाय्याने प्रकल्पस्थळी झाडे लावून सदर प्रकल्प पर्यावरणपूरक करण्याबाबत प्रयत्नशील राहण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीचा आढावा दर १५ दिवसांनी सादर करावा, असे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकारी, प्रकल्प विकासक तथा म्हाडा अधिकाऱ्यांना दिले.

## उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते

# पुणे मंडळाच्या ३,१२० सदनिकांची संगणकीय सोडत



वाढत्या शहरीकरणामुळे शहरांमध्ये परवडणाऱ्या दरातील घरांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) माध्यमातून परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत आहे. येत्या काळात सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी शासन प्रयत्नशील असून पुणे, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांतील म्हाडाच्या गृहनिर्माण योजनांना गती द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केले.

म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे २० टक्के सर्वसमावेशक योजना व प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत पुणे, पिंपरी चिंचवड शहरातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३१२० सदनिकांच्या ऑनलाईन सोडतीचा शुभारंभ उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आला. त्यावेळी श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी पुण्याचे पालकमंत्री श्री. चंद्रकांत पाटील, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर सिंह, 'म्हाडा'चे तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, पुणे मंडळाचे मुख्याधिकारी श्री. नितीन माने-पाटील, देखरेख समिती अध्यक्ष श्री. एम. एम. पोतदार, उपायुक्त श्री. दीपक नलावडे, समिती सदस्य श्री. धनंजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अन्न, वस्त्र या बरोबरच निवाराही आवश्यक आहे. रोजगारासाठी शहरी भागात नागरिक येतात. त्यांना माफक आणि परवडणाऱ्या किमतीत घरे उपलब्ध करून देताना किमान सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी 'म्हाडा'ने आपल्या प्रकल्पांना गती द्यावी. तसेच बांधकामाची गुणवत्ता अधिक उत्तम होईल, याची दक्षता घ्यावी. अधिकाधिक घरे उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाने नियोजन करुन लवकरात लवकर घरांच्या सोडती काढाव्यात, असेही श्री.फडणवीस यांनी सांगितले.

पुणे मंडळाने काढलेल्या ३१२० सदनिकांच्या सोडतीसाठी ५५,८४५ अर्ज प्राप्त झाले होते. या सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत २४८३, प्रधानमंत्रीआवास योजना (नागरी) अंतर्गत ६३७ सदनिकांचा समावेश होता. तसेच २९३८ सदनिका या प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील असल्याने संगणकीय सोडतीत त्यांचा समावेश करण्यात आला नाही. तसेच म्हाड कायद्यातील तरतुदींनुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील सदनिकांच्या खरेदीसाठी पात्रतेचे निकषही शिथिल करण्यात आले होते. म्हाडाने तयारकेलेल्या IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management system) या नूतन संगणकीय प्रणालीचा सर्वप्रथम वापर पुणे मंडळाने केला आहे.



## औरंगाबाद मंडळातर्फे

# ८४९ सदनिका व ८७ भूखंडांची ऑनलाईन सोडत उत्साहात

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) व मंडळाच्या विविध गृहनिर्माण योजनांतर्गत औरंगाबाद, लातूर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद येथे उभारण्यात आलेल्या ८४९ सदनिका व ८७ भूखंडांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत 'म्हाडा'चे तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. २७ एप्रिल रोजी ऑनलाईन पद्धतीने हा कार्यक्रम पार पडला.

औरंगाबाद मंडळाच्या मुख्यालयातील राजीव गांधी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला दूरदृष्य प्रणालीद्वारे गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर सिंह, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मुख्य अभियंता -१ श्री. धीरजकुमार पंदिरकर, म्हाडाचे वित्त नियंत्रक श्री. अजयसिंह पवार, सचिव श्री. राजकुमार सागर उपस्थित होते. माजी सभापती श्री. संजय केणेकर, मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अण्णासाहेब शिंदे आदी सभागृहात उपस्थित होते.

म्हाडाच्या Housing Lottery System IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management system) या नूतन एकात्मिक संगणकीय प्रणालीद्वारे सोडत काढणारे औरंगाबाद मंडळ हे म्हाडाचे दुसरे मंडळ आहे. या सोडतीसाठी सुमारे २,२२५ अर्जदारांनी अनामत रक्कम भरून अर्ज सादर केले होते. या सोडतीसाठी अर्जदारांकडून कुठल्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन संकेतस्थळ व ॲपद्वारे मागविण्यात आली होती. ही कागदपत्रे स्वयंचलित यंत्रणेने तपासून सोडतीसाठी अर्जदारांची पात्रता निश्चित करण्यात आली. अशा प्रकारे सोडतीसाठी पात्र अर्जदारांमधून सदनिका विक्रीसाठी संगणकीय सोडत काढण्यात आली.



सोडतीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ६०५ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी ३० सदनिका व आठ भूखंड, अल्प उत्पन्न गटासाठी ३७ सदनिका व २८ भूखंड, मध्यम उत्पन्न गटासाठी १०२ सदनिका व ४९ भूखंड, उच्च उत्पन्न गटासाठी तीन सदनिका यांचा समावेश करण्यात आला होता. सर्व उत्पन्न गटांतर्गत ७४ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या गटासाठी उत्पन्नमर्यादा शिथिल करण्यात आली होती. सोडतीत यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी म्हाडाचे अधिकृत संकेतस्थळ https://housing.mhada.gov.in व https://mhada.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अयशस्वी अर्जदारांना सात दिवसांत अनामत रकमेचा परतावा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या बँक खात्यावर केला गेला. सोडतीत यशस्वी अर्जदारांना १५ दिवसांत स्वयंचलित पद्धतीने तात्पुरते देकार पत्र ऑनलाईन पाठविले गेले. सदनिकेच्या विक्री किमतीचा भरणा विहित वेळेत करणाऱ्या यशस्वी अर्जदारांना सदनिकांचे तत्काळ वाटप करून दस्त नोंदणी, ई-रजिस्ट्रेशन पद्धतीने करायची होती. सोडतीचे सूत्रसंचालन उपअभियंता श्री. विलास जोशी यांनी केले. तसेच सोडतीच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. नितीन शिंदे, उपमुख्य अधिकारी श्री. जयकुमार नामेवार, मिळकत व्यवस्थापक श्री. शिवाजी ढोले, श्रीमती संगीता बहुरे आदींसह अधिकारी- कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.






## मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

# कोंकण मंडळाच्या ४,६४० सदनिका व १४ भूखंडांची संगणकीय सोडत



कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर-जिल्हा, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारलेल्या ४,६४० सदनिका व १४ भूखंडांच्या विक्रीकरिता अनामत रकमेसह प्राप्त ४८,८०५ अर्जांच्या संगणकीय सोडतीचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने करण्यात आला. ठाणे पश्चिम येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे कोकण मंडळाच्या वतीने या सोडतीचे आयोजन करण्यात आले होते.

कोकण मंडळातर्फे ६ मार्च २००३ रोजी सोडतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. दरम्यान १९ एप्रिल २०२३ पर्यंत अर्ज नोंदणी व भरणा प्रक्रिया राबविण्यात आली. या सदनिका विक्री सोडतीमध्ये अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत खोणी-कल्याण, शिरढोण, विरार-बोळिंज व गोठेघर येथील योजनेतील एकूण ९८४ सदनिकांचा समावेश करण्यात आला. या योजनेला केंद्र शासनाची मंजुरी असून योजनेमधील सर्व सदनिकांना केंद्र शासनाचे १.५० लाख व राज्य शासनाचे एक लाख अनुदान मिळणार आहे. या योजनेकरिता अनामत रकमेसह ३५२ अर्ज प्राप्त झाले. त्याचबरोबर २० टक्के सर्वसमावेशक योजनेंतर्गत एकूण १,४५६ सदनिकांच्या विक्रीकरिता अनामत रकमेसह ४६,१२१ अर्ज प्राप्त झाले. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना एक टक्के रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून कोकण मंडळास भरणा करावयाचा असून उर्वरित रकमेचा भरणा विकासकाकडे करावयाचा आहे.

या योजनेमधील सोडतीत १६६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आल्या होत्या. २,४४६ अर्जदार या योजनेमध्ये सहभागी झाले होते. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत विरार बोळिंज येथील २,०४८ सदनिकांचा समावेश असून त्यासाठी अनामत रकमेसह ३६९ अर्ज प्राप्त झाले होते. या योजनेत प्रथम अर्ज करण्यास प्रथम प्राधान्याने सदनिका वितरित करण्यात येणार आहे. सोडतीच्या कार्यक्रमाला केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री श्री. कपिल पाटील, आमदार किसन कथोरे. आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर-सिंह, म्हाडाचे तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, कोकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मारोती मोरे आणि मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे उपस्थित होते. सोडत कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी कार्यकारी अभियंता श्री. उदय मराठे, श्री. संदीप भडणे, श्री. संजय वराडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, उपमुख्य अधिकारी श्रीमती कल्पना पवार, मुख्य लेखाधिकारी श्रीमती नितळ लव्हाळे, मिळकत व्यवस्थापक श्री. स्वप्नील नाईक, श्री. अवधूत बेळेणेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

म्हाडाच्या माहिती व तंत्रज्ञान कक्षाच्या अद्ययावत IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System) या संगणकीय प्रणालीद्वारे सोडत काढणारे हे तिसरे मंडळ आहे. अर्ज नोंदणी, अर्जभरणा, पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणे, अनामत रक्कम भरणा या सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पूर्णतः मानवीय हस्तक्षेपाशिवाय झाल्या. नूतन संगणकीय प्रणालीला अर्जदारांची भरपूर पसंती मिळाली आहे.



मराठी भाषा दिवस

# म्हाडा मुख्यालय : महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात 'म्हाडा'चे तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी खेरवाडी पोलीस ठाण्यातील पोलीस पथकाने व म्हाडातील सुरक्षा रक्षकांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मारोती मोरे, मुंबई मंडळाच्या सहमुख्य अधिकारी श्रीमती नीलिमा धायगुडे, 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, उपमुख्य अभियंता श्री. संतोष बोबडे, उपमुख्य अभियंता श्री. किशोरकुमार काटवटे, उपमुख्य अभियंता श्री. सुधीर पाटील, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, कार्यकारी अभियंता श्री. निलेश मडामे, निवासी कार्यकारी अभियंता श्री. प्रकाश सानप, श्री. उरणकर, दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. संजय शिंदे आदींसह म्हाडातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मराठी भाषा गौरवदिनी प्रा. प्रकाश आल्मेडा यांचे प्रतिपादन

# ज्ञानसमाज साकारण्यासाठी मराठी ज्ञानभाषा होणे गरजेचे!





म्हाडा मुख्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'प्रशासनात मराठीचा परिणामकारक वापर' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेत सर्वसमावेशक समाज घडविण्यासाठी भाषा महत्त्वाची आहे. ज्ञानसंपन्न समाज साकारण्यासाठी मराठी ज्ञानभाषा होणे गरजेचे आहे. मराठी भाषेचा प्रभावीपणे वापर केल्यास प्रशासन अधिक गतिमान होण्यास मदत होईल. प्रशासनात मराठीच्या प्रभावी वापरासाठी शब्दकोश, शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश यांचा आवर्जून उपयोग करावा, असे प्रतिपादन प्रा. प्रकाश आल्मेडा यांनी केले. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांची जयंती आणि मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून म्हाडातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'प्रशासनात मराठीचा परिणामकारक वापर' या विषयावर प्रा. आल्मेडा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. आल्मेडा बोलत होते. यावेळी 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदीरकर, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, म्हाडा कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. मोहनराव कोळी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रा. आल्मेडा म्हणाले की, प्रशासनातील मराठी अधिक सुलभ, समजण्यास सोपी व मुद्देसूद असली पाहिजे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी परिभाषा रुजविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रशासनात काम करताना बोली भाषेतील शब्द टाळावेत, शिष्टताही प्रशासकीय भाषेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. विचारांची भाषा मराठी असेल तर संप्रेषणाची ज्ञानभाषा मराठी होईल, असेही प्रा. आल्मेडा यांनी सांगितले. मसुदा लेखन, टिपणी लेखन, भाषांतर, अचूक शब्दप्रयोग या विषयांबाबतही प्रा. आल्मेडा यांनी माहिती दिली. 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर म्हणाले की, मराठी भाषेचा प्रसार, प्रचार व्हावा, संवर्धन व्हावे या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सहज, सोप्या, मुद्देसूद मराठीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन श्री. सागर यांनी केले. 'म्हाडा'चे जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले. या वेळी 'म्हाडा'तील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्करोगग्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांची व्यवस्था होणार

# टाटा मेमोरियल रुग्णालयाला म्हाडाने दिल्या १०० सदनिका

सर्वसामान्य नागरिकांच्या घरांच्या प्रश्नांप्रती कायम संवेदनशील असलेल्या म्हाडाने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासत मानवतेच्या दृष्टिकोनातून मुंबई शहरात कर्करोगग्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांची व काळजीवाहू व्यक्तींच्या निवासाची सोय केली आहे. राज्य शासनातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) १०० सदनिका टाटा मेमोरियल रुग्णालयाला उपलब्ध करून दिल्या आहेत.

टाटा मेमोरियल रुग्णालय हे कर्करोग रुग्णांचे उपचार करण्यासाठी नावाजलेले असून येथे उपचारासाठी फक्त महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभरातून कर्करोगग्रस्त रुग्ण येत असतात. सहाजिकच त्यांच्यासोबत त्यांचे नातेवाईक व काळजीवाहू व्यक्तीही येतात. परंतु त्यांच्या राहण्याची व्यवस्था नसल्याने किंवा खासगी निवासस्थानाची सोय असलेले ठिकाणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने बरेचदा नातेवाईकांना फुटपाथवर राहावे लागते. परिणामी त्यांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागतो. मात्र आता त्यांना राहण्याकरीता म्हाडाने १०० सदनिका उपलब्ध करुन दिल्या आहेत. रुग्णालयाशेजारी असलेल्या परळ, शिवडी विभाग, महादेव पालव मार्ग, डॉ. बी. ए. रोड, करी रोड मुंबई येथील हाजी कासम चाळ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या समूह पुनर्विकास योजनेमधून म्हाडाचा विभागीय घटक असणाऱ्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास एकूण १८८ सदनिका प्राप्त झाल्या आहेत. यापैकी ३०० चौरस फुटांच्या १०० सदनिका टाटा मेमोरियल रुग्णालयास उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या १०० सदनिका नाममात्र दराने (रु. १ प्रतिवर्ष) ३० वर्षांकरिता भाडेपट्टा करारनाम्यानुसार म्हाडाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून विशेष बाब म्हणून टाटा मेमोरियल रुग्णालयास उपलब्ध करून देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला. म्हाडातर्फे देण्यात आलेल्या सदनिकांच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी टाटा मेमोरियल रुग्णालयाकडे सोपविण्यात आली असून गृहनिर्माण विभाग (म्हाडा) व टाटा मेमोरिअल रुग्णालय यांच्यामध्ये करारनामा करण्यात आला आहे.

टाटा मेमोरियल रुग्णालयामध्ये कर्करोगावर उपचारासाठी देशातील विविध राज्यांतून रुग्ण येत असतात. रुग्णाला पूर्णपणे रोगमुक्त होण्यासाठी साधारणतः २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागतो. या दोन ते तीन महिन्यांसाठी रुग्णासह रुग्णाच्या नातेवाईकांनाही मुंबईत राहणे गरजेचे असते. दाट लोकसंख्येच्या मुंबई शहरात मध्यवर्ती ठिकाणी महाराष्ट्र शासनाने म्हाडाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या १०० सदनिका या रुग्णांना जीवनदान देणाऱ्या ठरणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व खासदार श्री. शरद पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात या १०० सदनिकांच्या चाव्या श्री. शरद पवार यांच्या हस्ते टाटा मेमोरियल रुग्णालयाला सुपूर्द करण्यात आल्या.



## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अधिनियम, २०२०

# उपकरप्राप्त इमारतींचे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प लवकरच मार्गी लागणार

दक्षिण मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे. मुंबई शहरातील चौदा हजार इमारतीपैकी सुमारे बारा हजार इमारती 'अ' वर्गात मोडतात. या 'अ' वर्गातील इमारती सन १९४० पूर्वी उभारण्यात आलेल्या आहेत. मुंबई शहराचे भौगोलिक क्षेत्र लक्षात घेता तज्ज्ञांच्या मते शहर बेटावरील इमारतींचे आयुष्य सर्वसाधारणपणे ३५ ते ४० वर्षे असते. १९४० पूर्वी उभारण्यात आलेल्या या इमारती आज अत्यंत जीर्ण व धोकादायक स्थितीत आहेत. या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग लवकरात लवकर सुलभ होणे अत्यंत गरजेचे आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाद्वारे मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता व अनेक वर्षांपासून रखडलेले पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्याकरिता महाराष्ट्र शासनातर्फे नवीन धोरण तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

दि. २२ नोव्हेंबर २०२२ रोजी माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी सदर अधिनियमाला मंजुरी दिली आहे. माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. २ डिसेंबर, २०२२ रोजी सदर अधिनियम प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अधिनियमनाला आता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अधिनियम, २०२० असे म्हटले जाणार आहे. या नवीन कायद्यामुळे विविध कारणांमुळे अपूर्ण राहिलेले, रखडलेले उपकरप्राप्त इमारतींचे प्रकल्प म्हाडामार्फत ताब्यात घेऊन त्याचा पुनर्विकास करणे शक्य होणार आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे मुंबई शहराची क्षितिजरेषा निश्चितच बदलणार असून उपकरप्राप्त इमारतींचा रखडलेला पुनर्विकास लवकरच मार्गी लागून रहिवाशांचे त्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न नक्कीच पूर्ण होणार आहे.



### नवीन कलम ७९ अ

ज्या नवीन उपकरप्राप्त इमारतींना महानगर पालिकेने एमएमसी ॲक्टमधील कलम ३५४ अन्वये नोटीस बजावून अथवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने धोकादायक घोषित केली आहे, अशा इमारतींच्या मालकांना येथे प्रथम संधी मिळणार आहे. मालकाने सहा महिन्यांच्या आत ५१ टक्के भाडेकरू/रहिवाशांचे अपरिवर्तनीय संमती पत्र प्राप्त करून पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. सहा महिन्यांच्या आत मालकाने तसा पुनर्विकास प्रस्ताव सादर न केल्यास दुसरी संधी भाडेकरू/रहिवाशांना देण्यात येणार आहे. भाडेकरू/रहिवाशांनी प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेस सहा महिन्यांच्या आत ५१ टक्के भाडेकरू/रहिवाशांचे अपरिवर्तनीय संमती पत्र प्राप्त करून पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळात सादर करावयाचा आहे. त्यांनीदेखील सहा महिन्यांच्या आत पुनर्विकास प्रस्ताव सादर न केल्यास व विहित कलावधीत पुनर्विकास न केल्यास म्हाडाने ती इमारत व इमारतीचा भूखंड संपादित करून पुनर्विकास हाती घेण्याची तरतूद या नवीन कायद्यात केली आहे. संबंधीत इमारतींच्या मालकाला किवा भूखंड धारकला रेडिरेकनरच्या दराने २५ टक्के अथवा विक्री घटकाच्या बांधीव क्षेत्रफळाच्या १५ टक्के यापैकी जे अधिक असेल, अशा दराने नुकसान भरपाई देण्याची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे . त्यामुळे वर्षानुवर्षे रखडलेला उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास मार्गी लागणार आहे. मंडळाने सुधारित कलम ७९ (अ) अन्वये एकूण ६०० जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या मालकांना नोटीस बजावलेली असून मालकांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत मंडळास सादर करण्यास कळवले आहे. त्याचप्रमाणे ज्या उपकरप्राप्त इमारती धोकादायक किंवा दुरुस्तीपलीकडे आढळल्यास नवीन कलम ७९ अ अन्वये अशा इमारतींच्या मालकांना नोटीस बजावण्याच्या सूचना मंडळाच्या सर्व कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत.

### नवीन कलम ९१-अ

विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत मंडळांनी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर व महानगरपालिकेने आयओडी नकाशे मंजूर केल्यानंतर ज्या विकासकांनी तीन वर्षांच्या आत काम सुरू केले नाही किंवा महानगरपालिकेने सीसी (बांधकाम आरंभ करण्याचे प्रमाणपत्र) दिल्यानंतर दोन वर्षांपर्यंत काम सुरू केले नाही किंवा ना-हरकत प्रमाणपत्र धारक आणि अटी व शर्तींचा भंग केला असल्यास अथवा भाडेकरू रहिवाशांचे भाडे देणे बंद केले असल्यास मंडळाने शासनाच्या परवानगीने म्हाड अधिनियमातील कलम ९२ ते ९३ मधील तरतुदीनुसार मालमत्ता भूसंपादित करून उर्वरित पुनर्विकासाचे काम पूर्ण करणे. मंडळाने फेब्रुवारी-२०२३ मध्ये ज्या मालक/विकासकांनी पुनर्विकासाचे काम अर्धवट अवस्थेत सोडले आहे व भाडेकरू /रहिवाशांना पर्यायी जागेपोटीचे भाडे देणे बंद केले आहे, अशा सुमारे ६१ प्रकल्पांसाठी म्हाड अधिनियमातील सुधारित नवीन कलम ९१-अ अंतर्गत नोटीस बजावण्यात आल्या आहेत. सदर नोटीशीमध्ये मालक/विकासकांना भाडेकरू/रहिवाशांचे प्रलंबित भाडे १५ दिवसांच्या आत अदा करून काम सुरू करण्याची ताकीद दिली आहे. मालक/विकासकांनी जर प्रलंबित भाडे अदा केले नाही व काम सुरू केले नाही तर त्यांची मालमत्ता मंडळातर्फे भूसंपादित करण्यात येईल, असे कळवण्यात आले आहे. तसेच संबंधित कार्यकारी अभियंत्यांना भूसंपादनाचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. म्हाड अधिनियमातील नवीन कलम ९१-अ मधील तरतुदीनुसार मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडाने भूसंपादन करून पूर्ण करण्याची तरतूद आहे.

प्रतिभा आणि प्रतिमा

# इच्छा तेथे मार्ग

म्हाडामध्ये कार्यरत काही अधिकारी-कर्मचारी दैनंदिन कार्यालयीन कामकाजात व्यस्त असूनही वैयक्तिक जीवनात छंद, आवड जोपासताना दिसतात. छंद हा जोपासता येतो; मात्र कला ही अंगभूतच असावी लागते. म्हाडातील अधिकारी - कर्मचारी यांच्याकडेही विविध प्रकारचे कलागुण, प्रतिभा आहेत. या नवीन सदराच्या माध्यमातून 'म्हाडा'मध्ये कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जोपासलेले छंद, त्यांच्यातील प्रतिभा, कलागुण प्रतिबिंबाच्या (प्रतिमा) स्वरूपात सर्वांसमोर आणून इतरांनाही प्रेरणा मिळावी यासाठी हा प्रयत्न...




दीपमाला साळुंखे-बद्रे

दररोज धावण्यास सुरुवात केल्यामुळे दैनंदिन जीवनात त्याचा फायदा झाला असून आरोग्य उत्तम राहण्यास मदत होत आहे. आरोग्य उत्तम राहिल्यामुळे कार्यालयीन काम करताना उत्साह जाणवतो. त्यामुळे कार्यालयीन कामकाजातही रोज धावण्याचा फायदा होत आहे.

# ९० किलोमीटर अंतर सलग ११ तास ५० मिनिटे धावून पूर्ण करणाऱ्या मॅरेथॉनपटू : दीपमाला साळुंखे-बद्रे

म्हाडाच्या अमरावती मंडळात उपअभियंता म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती दीपमाला साळुंखे-बद्रे यांचे सन २०१४ मध्ये दुसरे बाळंतपण झाले आणि वजन ९० किलोपर्यंत पोहोचले. थोडे चालले की धाप लागायची. वारंवार कमरेत उसण भरणे सुरू झाले. त्यावर उपाय म्हणून सकाळी चालणे सुरू केले. सुरुवातीला एक किलोमीटर मग दोन किलोमीटर असे करता करता महिनाभरात त्या सहा किलोमीटरवर आल्या. नेमके याचवेळी अपघातात पायाला प्लास्टर लागले. ते निघाल्यानंतर म्हाडाची क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा सुरू झाली. त्यात बॅडमिंटन डबलसाठी उभे राहायला सांगितले. तोपर्यंत कधी बॅडमिंटन कोर्ट पाहिलेही नव्हते की नियम माहिती नव्हते. मॅच सुरू होण्याआधी नियम समजून घेतले आणि सर्व्हिसचा सराव केला. हे सुरू असतानाच जून २०१९ मध्ये अमरावती मॅरेथॉनचे होर्डिंग पाहिले आणि थेट दिलीप पाटील यांच्याकडे मार्गदर्शन घेतले. पहाटे साडेतीन वाजता उठून मुलाचा डबा करून ठेवायचा आणि पतीला सोबत घेऊन साडेचार ते साडेपाच धावण्याची प्रॅक्टिस करायची. सहा ते सात बॅडमिंटन खेळायला जायचे, असा रतीब सुरु केला. अखेर ऑक्टोबर २०१९ मध्ये २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉनसाठी त्यांनी नोंदणी केली. त्या सांगतात, 'सहभागी स्पर्धकांमध्ये शेवटी मी पोहोचले; पण तेव्हाच स्वतःला चॅलेंज दिले पुढच्या वेळी बक्षीस घ्यायला स्टेजवर असण्याचे.'

## टाटा मॅरेथॉन हुकली बॅडमिंटनमध्ये सुवर्ण

जानेवारी २०२० मध्ये होणाऱ्या टाटा मॅरेथॉनमध्ये भाग घ्यायला मार्गदर्शक दिलीप पाटील यांनी सांगितले पण त्याचवेळी बॅडमिंटन स्पर्धा लागल्या दीपमाला यांनी मॅरेथॉन ऐवजी बॅडमिंटन वर लक्ष केंद्रित केले आणि सिंगल्स आणि डबल्स मध्ये सुवर्णपदक पटकावले. कोरोनामध्ये कडकडीत बंद होता अशावेळी फ्लॅटमधील ओपन पॅसेजमध्ये धावण्याचा त्यांनी सराव सुरू ठेवला.

## अमरावती मॅरेथॉनमध्ये सहभाग

कोरोना निर्बंध शिथिल झाल्यानंतर टाटा हाफ मॅरेथॉनसाठी दीपमाला साळुंखे यांनी तयारी सुरू केली. मात्र, कोरोनामुळे टाटा मॅरेथॉन होऊ शकली नाही. या दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक हरी बालाजी यांनी अमरावतीमध्ये ७२/४२/२१ किलोमीटर मॅरेथॉनची घोषणा केली. २१ किलोमीटरनंतर आता ४२ किलोमीटर धावायची त्यांना ओढ लागली. एक महिना राहिला असताना सराव सुरू केला. पहाटे अडीच वाजता धावणे सुरू करून पूर्ण करायला सकाळचे दहा वाजले. जानेवारी २०२१ मध्ये सात तासात ४२ किलोमीटर अंतर पूर्ण केले. विशेष म्हणजे त्यानंतर सुद्धा १ मे २०२१ या ४० व्या वाढदिवशी ४२ किलोमीटर अंतर सात तासांपेक्षा कमी वेळेत पूर्ण केले. दोन बाळंतपण आणि अपघात याचा बाऊ न करता श्रीमती साळुंखे यांनी धावण्याचा सराव कायम ठेवला आणि इच्छा तेथे मार्ग हे ब्रीदवाक्य खरे असल्याचे जगाला दाखवून दिले. या यशात निवृत्त विक्रीकर उपायुक्त आणि स्वतः धावपटू असलेले दिलीप पाटील तसेच तहसीलदार संतोष काकडे यांचे सहकार्य शब्दातीत आहे. त्यांच्या सहकार्यामुळे स्वप्नवत वाटणाऱ्या कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये सहभाग घेता येत आहे, अशी भावना श्रीमती बद्रे यांनी व्यक्त केली.

## अखेर गाठले 'कॉम्रेड्स'

श्रीमती दीपमाला साळुंखे-बद्रे यांनी यानंतर मुंबई मॅरेथॉनमध्ये ४२ किलोमीटर गटात नाव नोंदवले. मात्र ४ तास ५४ मिनिटे लागल्याने कॉम्रेड मॅरेथॉनचे संधी थोडक्यात हुकली. लोणावळा मॅरेथॉनमध्ये ५० किलोमीटर अंतर ५ तास ५० मिनिटांत पूर्ण करायचे होते. तेथे सव्वासहा तास लागले. पुणे मॅरेथॉनमध्ये मात्र दिलीप पाटील यांचे मार्गदर्शन व प्रत्यक्ष मैदानात उतरून त्यांनी सहकार्य केल्याने ४ तास ४३ मिनिटांत बाजी मारली. पहिल्या क्रमांकासाठी पुकारा झाला तेव्हा माहेरी आईसमोर बहुमान स्वीकारताना भावना उचंबळून आल्या. याच वेळी कॉम्रेड मॅरेथॉनचा मार्ग सुकर झाला.

कॉम्रेड्स मॅरेथॉन ही अंदाजे ९० किलोमीटरची अल्ट्रामॅरेथॉन आहे, जी दक्षिण आफ्रिकेतील क्वाझुलु-नताल प्रांतात दरवर्षी डर्बन आणि पीटरमारिट्झबर्ग शहरांदरम्यान होते. जगातील ही सर्वांत मोठी आणि सर्वांत जुनी अल्ट्रामॅरेथॉन शर्यत आहे. कॉम्रेड्स मॅरेथॉन शर्यतीची दिशा दरवर्षी डर्बनपासून सुरू होऊन पीटरमारिट्झबर्गला संपणारी 'अप' रन (८७ किमी) आणि पीटरमेरिट्झबर्गपासून सुरू होऊन डर्बनला संपणारी 'डाउन' रन (आता ९०. १८४ किमी) अशी असते. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकाने ४२.२ किलोमीटरची फूल मॅरथॉन ४ तास ५० मिनिटांत पूर्ण केलेली असणे आवश्यक असते. तसेच कॉम्रेड्स मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी तुमच्या शारीरिक क्षमतेबरोबर मानसिक शक्ती, इच्छाशक्तीसुद्धा प्रबळ असावी लागते. श्रीमती साळुंखे-बद्रे यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन स्पर्धा दिलेल्या वेळेत म्हणजेच १२ तासांच्या आत पूर्ण केली. स्पर्धेत ९० किलोमीटर अंतर पार करण्यासाठी सहा टप्पे असतात. ते सर्व टप्पे ठराविक वेळेत पूर्ण करणे आवश्यक असते. तसे न झाल्यास त्या स्पर्धकाला त्या-त्या ठिकाणी धावणे थांबवावे लागते व आयोजक त्यांना गाडीत बसवून परत घेऊन जातात. सहा टप्पे विहित वेळेत पूर्ण करून १२ तासांत ९० किलोमीटर मॅरथॉन पूर्ण करणाऱ्यांनाच पदक देऊन सन्मानित केले जाते. १२ तासांनंतर अंतिम रेषा बंद करण्यात येते. भारतातून ४०३ धावपटू या स्पर्धेत सहभागी झाले. श्रीमती साळुंखे-बद्रे यांनी ११ तास ५० मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण केली.

त्या सांगतात, 'मॅरेथॉन सुरू झाली तेव्हा ५ डिग्री अंश सेल्सिअस तापमान होते, तर दुपारी १० - ३ वाजेपर्यंत २३ डिग्री अंश सेल्सिअस तापमान होते. या गोठवणाऱ्या थंडीत धावण्याची मजाच खूप वेगळी होती. माझे पती श्री. प्रदीप बद्रे यांचे व मुले निसर्ग व योजक यांचे सहकार्य नेहमी मला लाभले. या मॅरेथॉन दरम्यान बऱ्याच वेळा मानसिक थकवा येतो. आपण आता पुढे जाऊ शकत नाही, असे वाटायला लागते, शरीराचा प्रत्येक अवयव दुखायला लागतो. अशा वेळी तुमची इच्छाशक्तीच तुम्हाला पुढे जाण्याचे बळ देते. जेव्हा जेव्हा तुमच्या मनात हा विचार येईल की आता मी माघार घेतो, अशा वेळी फक्त अशा गोष्टी आठवा की आपण ही शर्यत का सुरू केली होती, का मी एवढी मेहनत घेतली, का माझ्यामुळे माझ्या कुटुंबाला त्रास सहन करावा लागला, माझे हे यश बघण्यासाठी आपले लोक घड्याळाकडे डोळे लावून बसले असतील, आपली वाट पाहात असतील, वेळेत पूर्ण होण्यासाठी देवाकडे प्रार्थना करत असतील. आपली शारीरिक क्षमता असताना आपण का माघार घ्यायची? माघार घ्यायला खूप वेळ लागत नाही. पण ते विचार बाजूला सारून तुम्ही कसे पुढे जाता याची ही परीक्षा असते. जेव्हा तुम्ही हे विचार करता तेव्हाच तुमचे मन तुम्हाला याचे उत्तर देते. तुमच्या शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी तर तुम्ही मेहनत घेतलीच असते; पण अशा वेळी तुमची प्रबळ इच्छाशक्तीच तुम्हाला पुढे जाण्याचे बळ देते. स्पर्धेची अंतिम रेषा ओलांडल्यानंतरचा आनंदच निराळा असतो. आपण सगळा झालेला त्रास विसरतो. त्यानंतर जे हात, पाय दुखतात ते पदोपदी आपल्या यशाची, यशस्वीपणाची आठवण करून देतात. याला स्वीट पेन म्हणजेच गोड वेदना म्हणण्यात. धावताना जे वाटत की आता हे शेवटच, ते पुढच्या वेळी परत करू, यामध्ये परावर्तित होत. माझ्यासारखी ९० किलोपासून प्रवास सुरू करून आज ५५ किलो वजन कायम ठेवणारी, धावण्याचा काहीही अनुभव नसताना, घर सांभाळून नोकरी करणारी, मुलगा दहावीत असतानाही स्पर्धेसाठी तयारी करणारी अशी सामान्य स्त्री, चालणे ते ९० किमी धावणे इतका मोठा प्रवास करू शकते, तर जे आधीपासून फिटनेसबाबत जागरूक आहेत, सहजपणे धावू शकतात त्यांनी थोडी हिम्मत वाढवली, मेहनत घेतली आणि स्वतः वर विश्वास ठेवला तर कोम्रेड्ससारख्या स्पर्धा ते नक्कीच पूर्ण करू शकतात.' 'स्वतः वर विश्वास ठेवा. प्रयत्न सोडू नका. सातत्य ठेवा. स्वतः ला शिस्त लावून घ्या. आपोआप परिस्थिती आपल्याला अनुकूल होते. आपल्याला पुढे जाण्यासाठी सकारात्मकता निर्माण करते. कुठलीही गोष्ट अवघड असू शकते, पण अशक्य नक्कीच नाही. प्रत्येक गोष्टीचा आनंद घ्या. मग ते यश असो, अपयश असो की होणारा त्रास असो.'



**शब्दांकन : हेमंत पाटील,**
जनसंपर्क अधिकारी



# गुंफण

चल ऊठ गुंफण कर
हातात हात मिळून
कधी सुटणार नाही
कधी मोडणार नाही
अशी गुंफण कर ।।

तुझ्या पाठीचा कणा
घाव घालून मोडला
तो घाव भर
तुझ्या मेंदूत अंधश्रद्धेचे बीज रोवले
त्याला जाळण्याची तयारी
सीमेवर कर ।।



माघारी शत्रू तुझ्या
पाठीवार तो करण्या
चल ऊठ निधड्या छातीने
पुढे येऊन तू खेच कमान
वेध अचूक घेऊन लाव धनुष्याला तीर ।।

रान पेटून आले आता
आवाज गुंजतो नभी
चल हातात घेउनि हात
हक्काच्या लढाईला ऊठ मागे नको फिरू ।।

- श्री. शिवकुमार आडे, मुख्य अभियंता-३, प्राधिकरण.

# कौतुक पाल्यांचे



**देवेश राकेश बोगार**

**८६.६०%**

इयत्ता दहावी

श्री. राकेश सुरेश बोगार
उप अभियंता, झो.पु.प्रा.
यांचा मुलगा



**भक्ती राजेश शिराळ**

**८३.४०%**

इयत्ता दहावी

श्री. राजेश गोविंद शिराळ
सहाय्यक लेखा अधिकारी,
कोंकण मंडळ
यांची मुलगी



**प्रणव भूषण देसाई**

**८२.४०%**

इयत्ता दहावी

श्री. भूषण देसाई,
उपमुख्य अभियंता, मुंबई मंडळ
यांचा मुलगा



**अन्सारी जवेरिया अतिक्कुर रहमान**

**८०.८३%**

इयत्ता बारावी

श्री. अतिक्कुर रहमान
शाखा अभियंता, प्राधिकरण
यांची मुलगी



**अथर्व राजेश शिराळ**

**७४%**

इयत्ता दहावी

श्री. राजेश गोविंद शिराळ
सहाय्यक लेखा अधिकारी,
कोंकण मंडळ
यांचा मुलगा



**स्वराली संदीप केदारी**

**६३%**

इयत्ता दहावी

श्री. अर्चना केदारी
वरिष्ठ लिपिक,
पुणे मंडळ
यांची मुलगी



**श्लोक संदीप सदामत**

**५८%**

इयत्ता दहावी

श्रीमती विद्या सदामत
कनिष्ठ अभियंता, पुणे मंडळ
यांचा मुलगा



**देवर्ष सुनिल वेसावकर**

**५६%**

मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज
(एमएमएस)

श्री. सुनिल हरी वेसावकर
जप्तीदार, मुंबई मंडळ,
यांचा मुलगा



**प्रतिक उमाकांत सोनावणे**

**५३.१७%**

इयत्ता बारावी

श्री. उमाकांत सत्यवान सोनावणे
वाहन चालक, पुणे मंडळ
यांचा मुलगा

म्हाडा MHADA

परिसर परिचय

ऑगस्ट 2023

# कौतुक पाल्यांचे



**स्वरोम अभयकुमार कुलकर्णी**

## ९४.२०%

इयत्ता दहावी

श्री. अभयकुमार कुलकर्णी,
उपअभियंता, कोंकण मंडळ
यांचा मुलगा



**शरण्या संदानसिंग**

## ९३.६०%

इयत्ता दहावी

श्रीमती वैशाली गडपाले
मुख्य जनसंपर्क अधिकारी, म्हाडा
यांची मुलगी



**निसर्ग प्रदीप बद्रे**

## ९३.४०%

इयत्ता दहावी

श्रीमती दीपमाला साळुंखे-बद्रे
उप अभियंता,
अमरावती मंडळ,
यांचा मुलगा



**अनुष्का रोनाल्ड वाझ**

## ९२.०४%

इयत्ता दहावी

श्री. रोनाल्ड वाझ,
लेखाधिकारी-१, प्राधिकरण
यांची मुलगी.



**व्यंकटेश गोविंद जाधव**

## ९२%

इयत्ता दहावी

श्री. गोविंद नामदेव जाधव
कनिष्ठ अभियंता,
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
यांचा मुलगा



**मानसी मोहनराव कोळी**

## ९१.२०%

इयत्ता दहावी

श्री. मोहनराव कोळी
शाखा अभियंता, प्राधिकरण
यांची मुलगी



**यशिका धीरजकुमार जैन**

## ८९%

इयत्ता बारावी

श्री. धीरजकुमार जैन
उपअभियंता, कोंकण मंडळ
यांची मुलगी



**मृण्मयी विकास सहस्त्रबुद्धे**

## ८७%

इयत्ता दहावी

श्री. विकास दत्तात्रय सहसबुद्धे
वरिष्ठ लिपीक, मुंबई मंडळ
यांची मुलगी

सदर प्रकाशन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकरिता संपादक व मुख्य जनसंपर्क अधिकारी वैशाली गडपाले यांनी शीतल कम्युनिकेशन्स, १२०३, स्वप्नपुर्ती सोसायटी, सेक्टर-३६, खारघर, नवी मुंबई येथे छापून गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे प्रकाशित केले.